परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज
अंक १३३ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०२३
Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

हितगुजच्या मार्च महिन्यातला वासंतिक अंक आपल्या भेटीला येत आहे. वसंत ऋतू म्हणजे सर्व ऋतूंचा राजा. निसर्ग बहरलेला, चैतन्यदायी वातावरण असते. फळा-फुलांनी डवरलेला हा सुवासिक वसंत ऋतू.

दि. २७ फेब्रुवारी हा जागतिक मराठी भाषा दिन आहे.

***लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी***
***जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी***
***धर्म, पंथ, जात, एक जाणतो मराठी***
***एवढ्या जगात माय मानतो मराठी***

इंग्रजी आणि हिंदी अन्य भाषाभगिनींचा दु:स्वास न करता त्यांना सामावून, पचवून त्यांच्याही वरती मराठीचा झेंडा फडकावत ठेवण्याची इच्छाशक्ती प्रत्येक मराठी माणसात असली पाहिजे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे आवश्यक आहे. मराठी मायबोली आपली अस्मिता आहे.

शब्दांची लयलूट करणे किंवा शब्दनिर्मितीच्या टांकसाळी काढणे म्हणजे भाषा समृद्ध करणे नव्हे. जगातील अनेक प्रकारचे आणि मानवाचे विविध अनुभव निकोप, नीट आणि प्रभावीपणे व्यक्त करणारे साहित्य निर्माण करणे, म्हणजे भाषा समृद्ध करणे होय आणि मराठी भाषा ही समृद्ध भाषा आहे. ''माझ्या मराठीचे बोलू कौतुके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके मेळविन'' असा 'ज्ञानेश्वरी'सारख्या ललामभूत ग्रंथाची निर्मिती झाली ती मराठीतून ज्ञानोबांची ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची अभंगगाथा जोवर अक्षर अमर आहेत तोवर मराठी जिवंत राहाणार आहे. मराठीचे भवितव्य उज्वल आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षामध्ये दि. १९ फेब्रुवारी २०२३ पासून कवी राजा बढे यांचे 'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे गौरवगीत, महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून अंगिकारण्यात आले आहे, हे स्वागतार्ह, अभिनंदनीय आहे.

दि. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन आहे. स्त्री शक्ती म्हणजे तेजाचे आदिरूप. समाजाची स्वत:ची एक संस्कृती असते. तिला वळण व दिशा देण्याचे काम स्त्रिया प्रभावीपणे करतात.

सक्षमता ही आजच्या स्त्रीची ओळख आहे. त्यामुळे ती कोणतेही क्षेत्र असो यशाची मोहोर उमटवते. स्वत:चा विचार, नवा मार्ग आणि ध्येय हे तिचं तत्त्व आहे. सगळी क्षेत्र पादाक्रांत करीत तिनं स्वत:चं आकाश निर्माण केलं आहे. असो.

होळी आणि गुढीपाडव्याच्या समस्त मराठे परिवाराला शुभेच्छा!

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. १६ फेब्रुवारी, २०२३)
भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ८४३३६७४८२७ • इ-मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# पुणे शाखेचा ४४वा वर्धापन दिन

• सौ. मानसी योगेश गाडगीळ (रश्मी मराठे), पुणे

रविवार दि ५ मार्च २०२३ रोजी मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा नियोजित ४४ वा वर्धापन दिन ‘वेदशास्त्रोत्तेजक सभागृह’ पुणे येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात बहारदार कॉफीपान आणि अवनी गाडगीळ, अश्विनी आणि नेहा मराठे यांनी काढलेल्या उत्तम रांगोळीने केलेल्या स्वागताने झाली.



दीपप्रज्वलन: अंजली, मानसी (मराठे) गाडगीळ

सौ. मानसी(मराठे) गाडगीळ यांनी उपस्थितांचे स्वागत करून, कार्यक्रमाची सूत्रे, सूत्रसंचालक राहुल मराठे यांजकडे सुपुर्द केली. ईशस्तवन नेहा राहुल मराठे, आणि अवनी योगेश गाडगीळ यांनी सादर केले. उपस्थितांतील जेष्ठ मंडळींनी दीपप्रज्वलन केले.

१) श्री अरूण मराठे, जेष्ठ सभासद २) श्री. डी.के. मराठे, विश्वस्त ३) श्री. विजय मराठे, अध्यक्ष/विश्वस्त ४) श्री. श्रीनिवास मराठे, सभासद (मुंबई) ५) सौ. अंजली मराठे, अध्यक्षा (पुणे शाखा)

दिवंगत कुलबांधव/भगिनी यांना श्रध्दांजली वाहिल्यानंतर नियोजित कार्यक्रमास सुरुवात झाली.

आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद विश्वस्त श्री डी.के. मराठे यांनी भूषविले. प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी कार्यकारिणी आणि अध्यक्ष निवडणुकीच्या प्रक्रियेची माहिती दिली




सुस्वागतम: रांगोळी

आणि विहित ७ सदस्य निवडीसाठी केवळ ७ अर्ज आल्याने, सर्व अर्जदारांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. तसेच नवनिर्वाचित सदस्यांची ओळख करून दिली.

श्री. डी.के. मराठे यांनी नवीन कार्यकारिणी ला आणि सर्व सभासदांना होळी आणि रंगपंचमी उत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

नवीन पुणे कार्यकारिणीत पुढील सदस्य आहेत.

१) सौ. अंजली विजय मराठे
२) सौ. मंजिरी मोहन मराठे
३) श्री. संजय मराठे (पुणे)
४) श्री. चंद्रशेखर विद्वांस
५) सौ. मानसी योगेश (मराठे) गाडगीळ
६) सौ. अश्विनी राहुल मराठे



दीप प्रज्वलन: ज्येष्ठ सभासद श्री. अरुण मराठे




माननीय व्यासपीठ: विजय, DK, सौरभ




मनोगत: मावळत्या अध्यक्षा अंजली मराठे



प्रतिष्ठानच्या योजना: हेमंत मराठे



सूत्रसंचालन: राहुल मराठे

७) सौ. विभावरी (जोशी) कुलकर्णी.

म.प्र. पुणे शाखेच्या माजी अध्यक्षा सौ. अंजली विजय यांनी कार्यकारिणीच्या कार्यकाळातील तीन वर्षातील कार्याचा आढावा घेतला. म.प्र.च्या विविध योजना सांगितल्या, विचाराधीन असलेले उपक्रम सांगितले, तसेच सभासद वाढावेत, संस्था बळकट व्हावी यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, विविध उपक्रम सभासदांनी सुचवावेत, असे आवाहन केले.

मध्यंतरात श्री. हेमंत मराठे (कार्यवाह मुंबई) यांनी संस्थेच्या वैद्यकीय मदत तसेच शैक्षणिक मदत, तसेच प्रतिष्ठानच्या शैक्षणिक पारितोषिक योजनांविषयी माहिती दिली.

त्यानंतर श्री. श्रीनिवास मराठे यांनी कुलबांधव/भगिनी यांना कुलवृत्तांताचे (संगणकीकरण), त्यात त्यांचे चालू असलेले काम, आणि नवीन पिढी साठी सोपी सुटसुटीत कुलवृत्तांत नोंदणी आणि आपली माहिती भरण्याची (Profile बनविण्याची) प्रक्रिया अशा विविध बाबींसंदर्भात माहिती दिली.




सांगितिक कार्यक्रम

स्वरगंध समुहाच्या बहारदार गायनाची सुरवात जयोस्तुते या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चिरतरुण गाण्याने झाली. सदर कार्यक्रमात नव्या जुन्या पिढीतील गाण्यांचा संगम होता. ने मजसी ने परत मातृभूमीला या गाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

आभारप्रदर्शन आणि नंतर सामुदायिक वंदेमातरम् होऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन, श्री राहुल रमेश मराठे (संकेतस्थळ मित्रक्रिडा) यांनी पार पाडले.

डोसा/उत्तप्पा, ढोकळा, गुलाबजाम असा अतिशय उत्तम मेन्यू होता. त्या चवदार अल्पोपहाराचा सर्वांनी आस्वाद घेतला आणि पुन्हा भेटण्याच्या आणाभाका घेत उपस्थित मराठे कुलबांधव/भगिनी आपापल्या घरी मार्गस्थ झाले.

या कार्यक्रमाची काही विशेष उल्लेखनीय वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

१) निमंत्रण पत्रिका घरोघरी जाऊन, लोकांना अगत्याचे निमंत्रण करणारे हेमंत मराठे(पुणे) यांच्या प्रयत्नांना यश आले.

२) या वर्षीच्या कार्यक्रमात तरूण वर्गाचा उत्साही सहभाग होता. तरुणाईची उपस्थिती नोंद घेण्यायोग्य म्हणजेच ७० पैकी २०/२५ एव्हढी होती.



प्रीतीभोज

३) नेहा राहुल मराठे (ईशस्तवन गायन,रांगोळी काढण्यात सहभाग) आणि अवनी योगेश गाडगीळ (ईशस्तवनात टाळ वादन आणि सलग चार वर्ष रांगोळी काढून) या तरुणींचा उत्साही सहभाग. अवनी ही कार्यवाह मानसी गाडगीळ (रश्मी मराठे) या माहेरवाशिणीची कन्या.

४) अश्विनी राहुल मराठे उत्साही सहभागा बरोबरच विविध जबाबदारीची कामे लीलया पार पाडली. गायक कलाकारांचे आयोजनही केले.

५) राहुल रमेश मराठे यांनी आपल्या कार्यबाहुल्यातून वेळ काढून सूत्रसंचलन केले.

६) नितिन मराठे नव्याने पुणेकर झाले आहेत. परंतु त्यांनी कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका बनवण्यात सौरभ मराठे यांच्या बरोबरीने सहभाग घेतला. तसेच ऐनवेळी उद्भवलेल्या पाणीटंचाईवर त्वरित तोडगा काढला. त्यांचे विशेष आभार.

७) तरुणांचे कौतुक तर आहेच, पण वयस्क तरुण कार्यकर्ते सुध्दा कुठे कमी पडले नाहीत, हळदकंकू/अत्तर देण्याची जबाबदारी दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा सौ. आसावरी मराठे आणि सीमा मराठे यांनी पार पाडली, नावनोंदणी आणि उपस्थिती तसेच **उपस्थित बांधवांच्या मुलांचे संपर्क क्रमांक** घेण्याचे महत्वाचे काम सुनिता मराठे यांनी दरवर्षी प्रमाणे व्यवस्थित पार पाडले.

८) नवीन सभासद झालेल्यांचे सभासद पत्र भरून घेणे, पैसे घेणे त्याचा चोख हिशेब ठेवण्याची महत्वाची जबाबदारी सुधाकर (बाळ) मराठे यांनी नेहमी प्रमाणेच बजावली.

९) अल्पोपाहार समारंभात असलेली टोकन पध्दत, श्री मोहन मराठे यांनी उत्तम रित्या सांभाळली.

१०) पुणे शाखेच्या अध्यक्षा, सौ. अंजली, खजिनदार सौ. मंजिरी, सौ. अश्विनी, सौ. प्राजक्ता (विभावरी), सर्वश्री. राहुल, सौरभ, नितिन, हेमंत (पुणे), हेमंत (मुंबई), विजय, विश्वस्त डी. के. मराठे, सौ. भाग्यश्री, या सर्वांनी यजमानपद समर्थपणे सांभाळत सर्व उपस्थित मंडळींनी अल्पोपाहार घेतल्याची खातरजमा करून घेतली.

११) कार्याध्यक्ष विजय यांनी आर्थिक व्यवस्थापन आणि नियोजन या बाजू समर्थपणे पेलल्या.

१२) सौरभची केवळ दीड वर्षे वयाची मुलगी श्रिजा ही या कार्यक्रमातील सर्वात लहान व्यक्ती. तिच्या बालसुलभ लीलांनी सर्वांनाच आपापल्या बालपणाची आठवण करून दिली.

अल्पोपाहारातील उत्कृष्ट पदार्थांसाठी, १) चितळे बंधू (गुलाबजाम), २) चौधरी बंधू (ढोकळा), ३) मुलिया डोसा (डोसा उत्तप्पा) यांचे विशेष आभार.

अशा प्रकारे सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्तम रितीने पार पडला.

पुढील कार्यक्रमाचे नियोजन करायचे हा संकल्प करूनच कार्यकर्ते मार्गस्थ झाले.

अहवालात जर कुणाचा उल्लेख अनवधानाने राहिला असेल तर क्षमा असावी.

तळटीप: म.प्र. च्या उपक्रमात हातभार लावण्यासाठी एक विनंती, आपल्या परिवारात अगर आपल्या माहितीत असलेल्या मराठे कुलबांधव यांच्याकडे (दिवाळी २०२२ ते दिवाळी २०२३ या कालखंडात) निधन वार्ता घडली असेल तर त्याची माहिती मराठे प्रतिष्ठानच्या मुंबई आणि पुणे कार्यवाह यांच्याकडे येत्या दिवाळीपूर्वी एक महिना पाठवावी ही नम्र विनंती. ♦



आरोग्यं धन संपदा

# आहारात नैसर्गिक प्रतिजैविकांचा समावेश करा



**आलं** – लसूण यासारखी नैसर्गिक प्रतिजैविकं ही औषधांपेक्षा केव्हाही चांगलीच. आलं-लसूण ही सर्दी किंवा सतत होणाऱ्या संसर्गांना सामोरं जाण्यासाठी सर्वोत्तम प्रतिजैविकं आहेत, लसूण हे रोगप्रतिकार शक्तीवर्धक असतं, कारण त्यामध्ये 'ॲलिसन' हा महत्त्वाचा घटक आहे. हे जीवाणूंच्या पेशींची वाढ थांबवतं आणि त्यामुळे संक्रमण कमी होतं. आलं हे आतडी, घश्याचं संरक्षण करतं आणि नैसर्गिक रोगप्रतिकार शक्ती वाढवणारं आहे, म्हणून आलं घातलेला उकळलेला चहा चांगला असतो.

**वरीचे तांदूळ – भगर** – शक्ती वाढवणारा आणि तुटलेली हाडं जोडणारा तसंच कफ कमी करणारा हा पदार्थ थालीपीठ, खांडवी यात वापरता येतो.



**शिंगाडा** – शिंगाड्यातल्या आयोडिनमुळे हा पदार्थ उपवासात उपयुक्त ठरतो.

**लालभोपळा** – थंडावा निर्माण करणारा, हृदयाला हितकारक आणि थकवा घालविणारा उपयुक्त आहे.

**सुरण** – मूळव्याधीवर उत्तम पथ्य असणारी सुरणाची भाजी उपयुक्त आहे. त्वचेच्या आजाराने ग्रस्त असणाऱ्यांनी सुरण खाऊ नये.



**रताळे** – रताळे शरीर टिकविणाऱ्या घटकांचे म्हणजे ... धातूंचे पोषण करते. कोलेस्टेरॉल मर्यादित ठेवतं. कॅन्सरच्या विरोधात लढण्याची क्षमता वाढवते.


**राजगिरा** – राजगिऱ्यातील प्रथिनं पचण्यास सुलभ असल्याने कुपोषणापासून दूर ठेवतं. यात कॅल्शियम, लोह भरपूर असतं. ♦

## जगणे तरी कलंदर

उरल्या अता न काही
इच्छा झपाटलेल्या
अस्ताकडे निघाल्या
मस्तीतल्या कवाल्या।।

पण आजही उशाशी
तरणा सुगंध ठेला
अजुनी शिळ्या फुलांचा
निर्माल्य नाही केला।।

वय वाढले तरीही
उर्मीशी हो वशिला
दिसते अजून ओल
या कोरड्या बशीला।।



छाती भरून अजुनी
श्वासात मोहजाल
जगणे तरी कलंदर
जरी अर्ध रिक्त पेला।।

आता खरेच आहे
तरू हा बराच वठला
तरीही दिसे न पैल
ना राम राम म्हटला।।

अद्याप हा सुधाकर
सर्वस्व नाही हरला
अद्याप जीवनी या
रस,रंग खूप उरला।।

ज्ञानेश्वरी न अजुनी
मी ठेविली उशाला
अजुनी पसायदान
बहु दूर पश्चिमेला।।

**चित्रकाव्य: AK**
**(काव्यानंद) मराठे**
*कुर्धे, पावस, रत्नागिरी*
९४०५७५१६९८



पत्रकार भवन उद्घाटन कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा पत्रकार संघाच्या सर्व आजी-माजी अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. कै. श्रीधर मराठे (वेंगुर्ले किरात) यांच्या वतीने शशांक मराठे व सीमा मराठे यांनी सत्कार स्वीकारला.




१) उन्हाळ्यात साखरेच्या बरणीत तर चार-पाच लवंगा ठेवाव्यात मुंग्या येत नाहीत.

२) शिजणाऱ्या पदार्थात मीठ सर्वात शेवटी घालावे. अगोदर घातल्यास पदार्थ शिजण्यास वेळ लागतो.

३) पुरणाची डाळ व गुळ शिजवताना डाळ पारदर्शक दिसू लागली की पुरण झाले असे समजावे.

४) दहीवड्यांसाठी दही लावताना दुधातच साखर विरघळून विरजण लावावे.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'भारतरत्न' नको!

◆ भा. ल. महाबळ, मुलुंड

'भारतरत्न' हा किताब काय साधासुधा आहे काय? भारतरत्न मिळालेल्या व्यक्तींची नावं वाचली तर नामस्मरणाचं पुण्य लाभेल!

स्वा. सावरकरांविषयीच्या अमाप भक्तीपोटी कोणीतरी सुचवलं आहे की, स्वा. सावरकरांना ही भारतरत्न पदवी द्यावी! अनेक मान्यवरांना मरणोत्तर ही पदवी दिली त्याप्रमाणे.

स्वा. सावरकरांना या सूचनेबाबत काय वाटलं असतं, याचा मी अंदाज करू शकतो.

स्वा. सावरकरांच्या एका भाषणातील एक वाक्य मला स्मरतं.

स्वा. सावरकरांच्या तत्त्वज्ञानातील सिद्धांतातील दोष काढून त्यांच्यावर टीका करणाऱ्यांना उद्देशून स्वातंत्र्यवीर म्हणाले होते, 'माझा कान धरायचा अधिकार फक्त छत्रपती शिवप्रभू व भगवान श्रीकृष्ण यांनाच आहे. इतरांना नाही.'

स्वा. सावरकरांना आपलं स्थान पूर्ण माहीत होतं. त्यांना आत्मस्वरूपाचं ज्ञान होतं. ऐऱ्यागैऱ्यांची प्रशंसा काय किंवा टीका काय याविषयी स्वा. सावरकर पूर्णपणे उदासीन होते. आपण मांडत असलेलं तत्त्वज्ञान व आपले सिद्धांत हे चिरकालीन सत्य आहेत याचा त्यांना आत्मविश्वास, जाणीव होती.

आजच्या राज्यकर्त्यांकडून स्वातंत्र्यवीरांना किताब किंवा पदवी? स्वा. सावरकरांना पदवी देणाऱ्यांची पात्रताही तशीच हवी!

ज्यांच्या आर्थिक धोरणांमुळे देशाचे दिवाळे निघाले आहे, ज्यांच्या बेगडी निधर्मीपणामुळे काश्मीरसारखा जळता प्रश्न निर्माण झाला आहे, ज्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे बेकारी, महागाई, लोकसंख्या-प्रस्फोट हे भस्मासूर उभे राहिले आहेत, ज्यांच्या चारित्र्यशून्यतेमुळे व खाखावृत्तीपोटी देशभक्त - समाजसेवक या गौरवपर शब्दांना लांच्छनाचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्या राज्यकर्त्यांकडून स्वा. सावरकरांना पदवी?

दिवाळखोर नातवानं कर्तबगार उद्योगपती आजोबांच्या पाठीवर भारतरत्नपदाची शाबासकीची थाप मारायची ही तऱ्हा विपरीत वाटते!

आणि किती पिढ्या मागं जाणार? किती नररत्नांचा शोध घेणार? आणि यांना भारतरत्न पदवी देणाऱ्या राज्यकर्त्यांच्या आजच्या पिढीचा असा काय अधिकार लागून गेला आहे.

विवेकानं, विचारानं, भारतरत्न पदवी मागच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची उद्धट धिटाई आपण आवरली पाहिजे.

स्वा. सावरकरांची 'शाबास' म्हणून पाठ थोपटण्याचा अधिकारही, ज्यांना 'आपला कान धरण्याचा अधिकार आहे' असं स्वातंत्र्यवीर म्हणत त्यांनाच-म्हणजे शिवप्रभूंना व भगवान श्रीकृष्ण यांनाच आहे!

स्वा. सावरकर या तेजाळ सूर्याचा प्रकाश त्यांच्या हयातीत ज्यांना सहन झाला नाही त्यांनी वरातीमागून भारतरत्न पदवीचं हे घोडं, स्वा. सावरकरांच्या नावापर्यंत न आणावं हेच उत्तम!

*आदानस्य प्रदानस्य कर्तव्यस्य च कर्मण:।*
*क्षिप्रम् अक्रियमाणस्य काल: पिबति तद्रसम् ।।*

हा संस्कृत श्लोक सांगतो, 'देण्याघेण्याचं कर्तव्यकर्म ताबडतोब करावं. देण्याघेण्याच्या कामात दिरंगाई केली की कालपुरुष त्या कामातील रस व गोडी पिऊन टाकतो.'


स्वा. सावरकरांचं न्याय्य देणं इतक्या उशिरा चुकवण्यात आता गोडी उरली नाही!

त्या महापुरुषाच्या कर्जात राहण्यावाचून आता गत्यंतर नाही!

स्वा. सावरकरांचं कर्ज फिटणं नाही!

*भा. ल. महाबळ हे मराठे प्रतिष्ठानचे भूतपूर्व अध्यक्ष कै. रमाकांत विदवांस यांचे स्नेही आहेत.*

◆



**एस. एस. मराठे** यांना भावपूर्ण श्रद्धांजली
त्यांच्या आत्म्यास सद्गती प्राप्त होवो
एस एस अशीच त्यांची ओळख होती.
प्रेषकः विजय विष्णु मराठे, अध्यक्ष मराठे प्रतिष्ठान

# हार्मोनियम वादनातील दीपस्तंभ

• श्री. मिलिंद कुलकर्णी

**हार्मोनियम वादनातील गुरू पं. प्रमोद मराठे यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त त्यांच्या विद्यार्थ्यांनी मिळून सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्या शिष्याने त्यांना दिलेली मानवंदना...**

हार्मोनियम वादनामध्ये पं. प्रमोद मराठे हे नाव प्रसिद्ध आहे. त्यांचा अथक रियाझ, हार्मोनियम वादनाची त्यांची एक स्वतंत्र शैली, धीरगंभीर, रुबाबदार व्यक्तिमत्त्व आणि मिश्कील स्वभाव यामुळे मराठे सरांची वेगळीच ओळख निर्माण झाली आहे. एक विद्यार्थी म्हणून मी सुमारे सात-आठ वर्षे गुरुकुल पद्धतीने शिक्षण घेताना मी सरांना खूप जवळून अनुभवले आहे.



उत्तम कलाकारासोबतच एक आदर्श व्यक्ती, गुरू, गांधर्व महाविद्यालयासारख्या मोठ्या संस्थेचा संचालक आणि एक उत्तम आयोजक कसा असावा हे मी बघितले. 'जिभेवर सरस्वती ठेवायची' हा सरांनी मला दिलेला पहिला धडा. खरे तर सरांनी आम्हा विद्यार्थ्यांना फक्त हार्मोनियम वादनाचे धडे न देता एक उत्तम व्यक्तिमत्त्व, तब्येत व्यवस्थित राखून आर्थिक नियोजन कसे करावे, इतर कलाकारांशी किंवा लोकांशी व्यवहार (बोलण्याचा) कसा असावा, आदींचा कटाक्षाने वस्तूपाठ घालून दिला. अजूनही आम्हाला कोणतीही शंका असेल, काही वैचारिक गुंता मनात घोळ घालत असेल, तर आम्हा विद्यार्थ्यांचा एकमेव आधार म्हणजे मराठे सर. सांगीतिक आणि वैचारिक अनुभवाचे संस्कार त्यांनी आमच्यावर केले आणि आम्हाला समृद्ध केले. मराठे सरांचे शिष्य म्हणून मिरवताना आम्हाला धन्यता वाटते.

मी १९९८-९९ मध्ये सरांकडे शिकायला लागलो, तेव्हा आमची आर्थिक स्थिती सामान्यच होती. मात्र, माझ्यातील हार्मोनियम वादनाचे गुण त्यांनी हेरले आणि माझ्या वडिलांना सांगितले की, 'हा माझ्याकडेच राहील. तो स्वत: जोपर्यंत कमवणार नाही, तोपर्यंत मी कोणतेही शुल्क आकारणार नाही.' सरांकडे शिकता शिकता गांधर्व महाविद्यालयामध्ये मला सरांनी वर्ग चालवण्यास दिले. थोडे थोडे कार्यक्रम पण मिळू लागले.

रोज पहाटे पाच वाजता विद्यालयात येऊन ते माझ्याकडून जोर, बैठका, सूर्यनमस्कार घालून घेत असत. विद्यालयात राहत असताना रोज आठ आठ तास त्यांनी माझ्याकडून रियाझ करून घेतला. त्यांच्या साथसंगतीच्या अनुभवाचा आणि सोलो वादनासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक गोष्टी, जसे पलटे, रागविचार, त्यातील गती, बंदिशी, ठुमरी-दादरा यांचा सौंदर्यपूर्वक विचार, ध्रुपद आदी विषयांची तालीम दिली. त्याच काळात कार्यक्रमाच्या निमित्ताने दिल्ली, बेंगळुरू, धारवाड, मुंबई आदी शहरांमध्ये त्यांच्यासोबत ते मला घेऊन गेले. त्यामुळे मला ते कलाकारांसोबत, आयोजकांसोबत, रसिकांसोबत कसे वागतात, बोलतात ते अनुभवता आले. अनेक कलाकारांशी ओळखी झाल्या. अनेक कलाकारांना साथसंगतीसाठी त्यांनी माझे नाव सुचवले.

सरांनी त्यांच्यापेक्षा वरिष्ठ हार्मोनियम वादकांसह समकालीन आणि कनिष्ठ वादकांचाही आदर केला. आज गांधर्व महाविद्यालयात देशातील अनेक नामवंत हार्मोनियम वादक आपली कला सादर करतात. ही सर्व मंडळी सरांचा आदर करताना दिसतात. सर्वांच्या वादन शैलीचा सरांनाही अतीव आदर आहे. वेगवेगळे बाज असणाऱ्या हार्मोनियम वादकांना तितक्याच आदराने सर सादरीकरणासाठी बोलावतात आणि त्यांच्या कार्यशाळा आयोजित करतात. या सर्व प्रवासात सरांच्या सहचारिणी परिणीता मराठे यांचाही मोलाचा वाटा आहे. वहिनींसारख्या गुरुमाता आम्हाला मिळाल्या, हे आमचे भाग्यच. सरांसोबत वहिनींनीही आम्हाला तितक्याच प्रेमाने सांभाळले. खरे तर सर-वहिनी म्हणजे आमचे आई-वडीलच आहेत. मराठे सरांना षष्ट्यब्दीपूर्तीनिमित्त आम्हा सर्व विद्यार्थ्यांतर्फे अनेक शुभेच्छा!

श्री. मिलिंद कुलकर्णी *(लेखक सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक आहेत.)* ♦

# जगापुढच्या आदर्शाचे प्रतिबिंब

•अभिजित फडणीस (पृ. २२७), ठाणे भ्रमणध्वनी : ९८२०४०२३४५

**इतरांचे अनुकरण करणारा देश ही भारताची ओळख लोप पावत आहे. भारत जगाचे नेतृत्व करायला सक्षम होत आहे. सर्वाधिक लोकसंख्या असूनही लोकशाही मूल्य जपत उत्तम नियोजनातून सर्वंकष प्रगती करण्यासाठी आणि शाश्वत जगाच्या निर्मितीसाठी भारत जगासाठी काही नवीन मापदंड निर्माण करू इच्छित आहे. या साऱ्यांचे प्रतिबिंब म्हणजे हा अर्थसंकल्प!**

संकटग्रस्त जागतिक परिस्थितीत चमकणारा तारा असं विद्यमान भारताचं वर्णन नक्कीच करता येईल. जगभरामध्ये वाढलेली महागाई, त्यावर अंकुश ठेवण्यासाठी वाढवलेले व्याजदर आणि त्यामुळे काही देशात संभाव्य मंदी, रेंगाळलेला आणि काहीसा उग्र होऊ शकेल, असा रशिया, युक्रेन प्रश्न, अनेक देशात वाढलेले कर्जाचे डोंगर आणि त्यातून निर्माण होणारा संभाव्य प्रश्न, तेलभावांबद्दल अशाश्वती या सर्व विषयांमुळे जग हे थोडसं व्यथित झालेलं असताना मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये सर्वांत सक्षम पद्धतीने वाढणारा असं देशाचे वर्णन करता येईल. यावर्षी जवळ जवळ ७ टक्के वृद्धीदर आणि पुढील वर्षी जागतिक कारणांमुळे कमी, तरी सुद्धा ६.५ टक्के संभाव्य वृद्धीदर ही अर्थसंकल्पाची पार्श्वभूमी उल्लेखनीय आहे.

सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प खैरातींची घोषणा करणारा असेल अशी सर्वसाधारण अपेक्षा होती. मात्र, सर्वंकष लोकानुनयाऐवजी वित्तीय शिस्तीचा पर्याय अर्थमंत्र्यांनी निवडलेला दिसतो. करोना काळात २०२०-२१ या आर्थिक वर्षात आपली वित्तीय तूट ही ९.५ टक्के एवढी प्रचंड वाढलेली होती ती २०२५-२६ पर्यंत ४.५ टक्के एवढी खाली आणली जाईल असे पूर्वीच अर्थमंत्र्यांनी सांगितलं होतं त्यानुसार या वर्षीच्या ६.४ टक्के तुटीच्या तुलनेत तूट पुढील वर्षी ५.९ टक्के एवढी खाली आणली जाईल, असे असूनही खाजगी क्षेत्रातील अपेक्षित गुंतवणूक अजूनही पुरेशी वेग पकडत नाही आणि त्याचबरोबर जागतिक परिस्थितीमुळे निर्यातीत घसघशीत वाढ होण्याची शक्यता धूसर असल्याने, खाजगी गुंतवणूक थोडी अधिक लांबणीवर पडेल याचं भान ठेवत गुंतवणुकीला चालना सरकारलाच द्यावी लागणार. पायाभूत सुविधांवरील खर्चातील वाढ त्यामुळे ३३ टक्के एवढी घसघशीत दर्शवण्यात आली आहे आणि त्याचे पडसाद रेल्वेतील गुंतवणुकीत उमटले आहेत. तसेच, विमानतळ, हेलिपोर्ट्स, पाण्यातील विमानतळ, बंदरे, सीमावर्ती क्षेत्रातील पायाभूत साधने या सर्वच बाबतीत प्रगतीचा अधिक वेग दिसला तर आश्चर्य नाही.

या वेळच्या सुटसुटीत भाषणात अर्थमंत्र्यांनी गेल्या काही वर्षात राबवलेल्या जनकल्याणकारी योजनांचा आणि त्यातून




मिळालेल्या साध्यांचा केवळ ओझरता उल्लेख केला. त्याचा खूप तपशील टाळून एका प्रकारे भारत आता नव्या उड्डाणासाठी तयार आहे, हे दर्शवलं आणि त्याचबरोबर तळागाळातील समाजासाठी शाश्वत विकासाच्या नवीन संधी आणि तरुणाईसाठी नवीन मार्ग उपलब्ध होण्यासाठी संकेत दिले आहेत. पुढील तीन वर्षांत एक कोटी बळीराजांनी नैसर्गिक शेतीकडे वळावं आणि नैसर्गिक

खतांचा अधिक वापर करावा, यासाठी दहा हजार सहायता केंद्रे उभारण्याची घोषणा तसेच 'श्री धान्य' म्हणजेच ज्वारी, बाजरी, रागी अशा परंपरागत तृणधान्यांबाबत भारताने जागतिक नेतृत्व करावं हा संकेत आरोग्य, शाश्वत विकास, तळागाळातील आर्थिक संधी, निर्यातीसाठी नवे पर्याय आणि विषमुक्त वसुंधरा या सर्वच दृष्टीने महत्त्वाचा आहे. बळीराजाला धान्य योग्य दरात विकता यावे, यासाठी वितरित स्वरूपाची साठवणूक शृंखला निर्माण करण्याची घोषणा ही नवीन दिशा देणारी.

वनवासी बांधवांसाठी सर्वंकष विकासाचा मार्ग खुला व्हावा यासाठी पुढील तीन वर्षात ठोस प्रयत्न आणि त्याचबरोबर या समाजातील मुलांना शिक्षणाच्या संधी मिळाव्यात म्हणून एकलव्य शाळांमध्ये भरीव शिक्षक भरती हेही विशेष. वंचित घटकांसाठी गृहयोजनेमधील तरतूदीत ६६ टक्के एवढी भरीव वाढ हे भारतीय समाजाला दैनंदिन आवश्यकतांच्या पूर्ततेसाठी लवकरात लवकर स्वावलंबी व्हावं आणि वंचित समाज प्रगतीच्या नव्या वाटांसाठी लवकर तयार व्हावा या दृष्टीने उचललेलं पाऊल, तरुणाई नवीन संधींसाठी तयार व्हावी यासाठी केलेल्या तरतुदी आर्टिफिशिअल इंटलिजन्स, रोबोटिक्स, मेकॅट्रॉनिक्स, ३-डी प्रिंटिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज, कृत्रिम हिरे निर्मिती, ड्रोन्स, नर्सिंग, पर्यटन, वैद्यकीय उपकरणे निर्मिती, फाईव्ह जी सेवा, औषध संशोधन यातील नवीन कौशल्ये विकसित करतील. ४७ लाख तरुणांना अप्रेन्टिसशिप मानधन थेट ट्रान्सफर होणार आहे. याने ज्ञानाधिष्ठित कर्मचारी वर्ग तयार करायला मदत करेल. उत्पादन क्षेत्रात भरीव प्रगती करणं हे अगत्याचं आहे आणि त्यासाठी कुशल तरुणाईची नितांत आवश्यकता आहे.

या अर्थसंकल्पामध्ये सहकारी क्षेत्र, पारंपरिक हस्तकौशल्ये आणि महिलांचे बचत गट या दृष्टीने काही पाऊले उचलली आहेत. सहकारी क्षेत्राचा विकास व्हावा म्हणून नवीन डेटाबेस तयार करण्याची घोषणा आहे. बहुउद्देशीय सहकारी संस्था निर्माण व्हाव्यात म्हणून सरकार पावले उचलणार आहे. महिलांच्या ८१ लक्ष परस्पर साह्य बचत गटांचा पुढील टप्पा म्हणून निर्मिती करणारे उद्योग तयार व्हावेत म्हणून तरतूद आहे. पारंपरिक हस्तकौशल्ये हा भारताचा अनोखा ठेवा आहे. त्यांना सुसूत्र बाजारपेठ हवी. त्यासाठी **विश्वकर्मा कौशल्य सम्मान योजना** असेल. देशांतर्गत पर्यटन या सर्वच समूहांसाठी उपयुक्त आहे आणि म्हणूनच ५० पर्यटन केंद्रांचा सर्वंकष विकास आणि त्याला तंत्रज्ञानाची जोड ही नवीन संधी निर्माण करेल.

अर्थसंकल्प म्हणजे राष्ट्र कुठल्या दिशेने वाटचाल करणार, याच्या ध्येयधोरणांचा आलेख, मात्र, मध्यमवर्गीय नागरी माणूस कररचनेकडे डोळे लावून बसलेला असतो. दोन वर्षांपूर्वी एक पर्यायी कररचना राबवण्यात आली आणि ती ऐच्छिक होती. मात्र ६.५ कोटी करदात्यांपैकी केवळ पाच लक्ष लोकांनी तिचा स्वीकार केला. कर वाचवण्यासाठी गुंतवणूक हे इतके अंगवळणी पडले आहे, की कर आणि गुंतवणूक यांची जोड न लावता त्या दोन्ही गोष्टी पूर्णपणे वेगळ्या दृष्टीने बघितल्या पाहिजेत आणि गुंतवणुकीचा परतावा वाढवण्यावर भर दिला पाहिजे, हा सरकारचा योग्य संकेत समाजाने गेली दोन वर्षे झुगारून दिला. आर्थिक साक्षरता कमी असल्याचे हे द्योतक. याच अज्ञानातून देशात विमा आणि गुंतवणूक यांची गल्लत होते.

नवीन कररचना यापुढे मूलभूत रचना म्हणून स्वीकारली जाईल आणि जुनी वैकल्पिक ठरेल. पण त्याहून मोठा बदल म्हणजे नवीन कररचना स्वीकारल्यास सात लक्षपर्यंत उत्पन्न असल्यास कर नसेल आणि त्यापुढील उत्पन्नावरही कमी कर बसेल. यापुढे तरी अनेक जण या विषयावर सखोल विचार करतील. निवृत्तीच्या वेळी मिळणारा लीव्ह एनकॅशमेंट मोबदला आता आकर्षण होणार आहे. अशा मंडळींना आता २५ लाखांवर कर भरावा लागणार नाही. ज्येष्ठांच्या बचत योजनांमध्ये भरीव वाढ सुचवली आहे. त्याचा त्यांना नक्कीच लाभ होईल. गुंतवणुकदारांना केवायसीचा व्याप कमी व्हावा आणि सामान्य माणूस सहज आर्थिक गुंतवणुकीकडे वळावा, यासाठी काही उपाययोजना झाल्या आहेत. तसेच उद्योग सुलभतेसाठी काही घोषणा झाल्या आहेत. त्यामुळे एकीकडे उद्योजकतेला प्रोत्साहन आणि दुसरीकडे बचतीचे आर्थिक गुंतवणुकीत रूपांतर अशी जोड दिसेल. गेल्या काही वर्षात अर्थसंकल्पाचे स्वरूप बदलून गेले आहे. नवीन रेल्वेच्या घोषणा, विविध वस्तूंवरील करात केलेले बदल हे आता कालबाह्य झाले आहेत. कॉर्पोरेट कराचे दर आता कमी झाले आहेत आणि स्थिर आहेत. कररचना सोप्या, सुटसुटीत आणि सुलक्ष होत आहेत.

इतरांचे अनुकरण करणारा देश ही भारताची प्रतिमा वेगाने लोप पावत आहे. भारत जगाचे नेतृत्व करायला सक्षम होत आहे. जगाच्या पाठीवर सर्वाधिक लोकसंख्या असूनही लोकशाही मूल्य जपत उत्तम नियोजनातून सर्वंकष प्रगती करण्यासाठी आणि प्रदूषण प्रश्नाला लवकरच मागे सारून शाश्वत जगाच्या निर्मितीसाठी भारत जगासाठी काही नवीन मापदंड, आदर्श निर्माण करू इच्छित आहे. जी २० चे आतिथ्य भारताकडे असणाऱ्या या वर्षातील हा अर्थसंकल्प त्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

*(लेखक अर्थतज्ज्ञ आहेत.)*

♦

# सुसह्य करू या शालेय शिक्षण

•श्री. कालीदास मराठे (पृ. ५४१), गोवा

शाळा प्रवेश, इतर अनावश्यक स्पर्धा, गृहपाठ, इंग्रजी माध्यमाची ओढ, दप्तराचे ओझे आदि विषयावर अनेक वेळा चर्चा नव्हे चर्वितचर्वण झालेले आहे.

पण पहिला बाजीराव म्हणत असे त्याप्रमाणे मुळावर घाव घालायला आम्ही कोणीच तयार नसल्याने हे सर्व विषय नवीन शैक्षणिक वर्ष सुरु व्हायच्या वेळी परत-परत पुढे येतात.

इंग्रजानी आपली शासनपद्धती सुरळीत चालावी यासाठी जी शिक्षणपद्धती राबविली ती १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण बदलली नाही. इतकेच नव्हे तर सर्वांनी डॉक्टर, इंजिनिअर व्हावे या दृष्टीने सारी शिक्षण व्यवस्था बेतली. विद्यापीठातून इंग्रजी माध्यमातून शिक्षण म्हणून महाविद्यालयात इंग्रजी माध्यम. महाविद्यालयात इंग्रजी माध्यम म्हणून उच्च माध्यमिक विद्यालयात पण इंग्रजी माध्यम. थोडक्यात, इंग्रजी माध्यमाचे लोण पूर्व प्राथमिक पर्यंत पोहोचले. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. चित्राताई नाईक म्हणतात त्याप्रमाणे ''मुलाऐवजी प्रौढांच्या - पालकांच्या आशा आकांक्षांचा पाठपुरावा करणारी शिक्षणव्यवस्था अलिकडे तयार झाली आहे. पाश्चात्य देशातील जीवघेणी स्पर्धा ही एक सामाजिक विषवल्ली आहे. ती भारतासारख्या विकसित देशातील उच्चभ्रू समाजात फोफावत आहे. बालकांचा किमान अभ्यासक्रम हा बालकांच्या गरजेतून स्वाभाविकपणे विकसित व्हायला हवा. सर्व बालकांना न पेलणारा, न आवडणारा अभ्यासक्रम त्यांच्यावर लादला जात आहे.'' यावर अधिक स्पष्टीकरण करण्याची गरज नाही. गरज आहे, पालकांची मानसिकता बदलण्याची.

अशीच परिस्थिती लेखी परीक्षेचे स्तोम माजल्याने झाली आहे. भाषा विषयातील श्रवण, संभाषण, वाचन यासाठी जितका वेळ सर्व वर्षात, सर्व वर्गात द्यायला हवा तितका दिला जात नसल्याने तीन तीन भाषा दहा - पंधरा वर्षे शिकूनही उत्तम बोलायला, वाचायला व लिहायला जमत नाही.

अभ्यासक्रम व पाठ्यक्रम याऐवजी फक्त पाठ्यपुस्तक हेच शिकवण्याचे व शिकण्याचे एकमेव साधन आहे, असे मानणाऱ्या सर्वांनाच पाठ्यपुस्तक वेळेवर मिळाले नाही की घाबरायला होते. पाठ्यपुस्तकाशिवाय अध्ययन कौशल्य विद्यार्थ्यात विकसित होणार नाही असे वाटते.

व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊ इच्छिणाऱ्या (जसे - डॉक्टरी, इंजिनीरिंग आदि) विद्यार्थ्यांसाठी वेगळी प्रवेशपरिक्षा (क्षमताधिष्ठीत प्रात्याक्षिक परिक्षेवर भर देणारी) घेऊन शालांत परीक्षेतील गुण - गुणवता यादी यांचे महत्त्व कमी करता येते. गणित - इंग्रजी यासारखे विषय सर्वांनाच सक्तिचे न करता ऐच्छिक ठेवल्यास व आणखी पर्याय दिल्यास सृजनशील अभिव्यक्ती असणाऱ्या मुलामुलींची शालांत परीक्षेतील कत्तल थांबेल.

परीक्षेतील गुणांपेक्षाही विविध उपक्रमातील गुणवत्ता महत्वाची आहे हे पालकांनी समजून घ्यायला हवे व त्याप्रमाणे आपल्या पाल्याचा कल ओळखून त्याला त्या त्या उपक्रमात भाग द्यायची संधी द्यायला हवी. अर्थात त्यासाठी शाळात अशा प्रकारचे विविध उपक्रम राबविण्याची सोय करायला हवी.

अर्थात आहे त्या परिस्थितीत काय सुधारणा करता येईल याची चर्चा मी वार्षिक तपासणीच्या वेळी माध्यमिक शाळांतील शिक्षक सभेत करीत असे त्याची यादी देतो.

१) दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी भाषा विषय सोडून इतर तीन विषयांची - विज्ञान, गणित व सामाजिक अध्ययनाची पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांनी दररोज शाळेत आणू नयेत.

२) वर्गकामासाठी फक्त एक वही आणण्यास सांगावी.

३) गृहपाठाचे वेळापत्रक तयार करून एका दिवशी एकच गृहपाठाची वही आणण्यास सांगावी.

४) गृहपाठ नेहमीच लेखी द्यावयाच्या ऐवजी गटामध्ये, ग्रंथालयाचा उपयोग, भेटी, चर्चा, प्रश्नांची उत्तरे लिहून आणण्याऐवजी धड्यावर प्रश्न तयार करून आणणे, आकाशवाणी - दूरदर्शनवरील बातम्या व इतर शैक्षणिक कार्यक्रम, वाचन, शैक्षणिक साधन, कात्रण संग्रह यासारखे दिल्यास स्वयंअध्ययन करायला मदत करतील.

५) वर्गवार भेटी - सहली, प्रत्येक वर्गाचे, प्रत्येक विषयाचे हस्तलिखित मासिक यासारखे उपक्रम आयोजित करून, सर्व विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन व लेखनास प्रवृत्त करतील. विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे कविता करणे, लेख-निबंध

लिहीणे, अनुवाद करणे, संग्रह करणे यासारख्या विविध गोष्टी करतील.

६) शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी एक दिवस नेहमीचे अध्यापन बंद करून शाळेतील सर्व पुस्तकांचे भाषावर, विषयवार प्रदर्शन सर्व वर्गखोल्या - इतर खोल्यात मांडावे. विद्यार्थी आणि शिक्षकांनी आपल्याला उपयोगी पडणारी, आवडणाऱ्या पुस्तकांची नोंद करावी. वर्षभरात ती वाचून काढण्याचे विद्यार्थी ठरवू शकतील. जी आवश्यक पुस्तके आपल्या विषयात नसतील ती शिक्षक मुख्याध्यापकांना विकत घ्यायला सांगू शकतील. रोजच्या अध्यापनात त्याचा वापर करू शकतील.

गावातील / तालुक्यातील पुस्तक विक्रेत्याच्या मदतीने विद्यार्थी - पालकांना उपयोगी पडतील अशा पुस्तकांची प्रदर्शने शाळेने भरवावीत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांत वाचनाची आवड विकसित होईल.

७) विद्यार्थ्यांनी सर्व उपक्रम व स्पर्धात सहभागी व्हावे या दृष्टीने उपक्रमाची चर्चा, मार्गदर्शन सर्व विद्यार्थ्यांना करावे व त्यानंतर आठ दिवसांनी सर्वांसाठी हा उपक्रम राबवावा. त्यातील पहिल्या तीन जणांना पुढे पाठवावे. शिक्षकांनी ठराविक विद्यार्थ्यांची निवड करू नये.

८) दहावी - बारावीची प्रश्नपत्रिका चांगली सोडविता यावी म्हणून त्याच धर्तीवर प्रश्नपत्रिका तयार करण्याचे लोण खालच्या इयत्तेपर्यंत नेण्याच्या पद्धतीमुळे मुलांवर मानसिक ताण वाढतो. प्रश्नपत्रिकेत येणाऱ्या प्रश्नात बदल करुन प्रश्न विचारल्यास विद्यार्थी गोंधळतो. 'घोकेल' व उत्तम प्रकारे उत्तरपत्रिकेत 'ओकेल' त्याला अधिक गुण, यामुळे स्वयंअध्ययनाला वाव राहत नाही. विचार करण्याची प्रवृत्ती नाश पावते. खरे तर शालेय परीक्षांमध्ये शाळांनी मूल्यमापन विविध तऱ्हेने करावे. परीक्षा सुधार कार्यक्रमात सुचविल्याप्रमाणे खुली पुस्तक परीक्षा पद्धत, प्रश्नपेढीतील प्रश्नावर आधारीत परीक्षा श्रेणी पद्धती, लेखी परीक्षेशिवाय तोंडी, प्रात्याक्षिक, चर्चा पद्धती यासारख्या पद्धतीचा उपयोग करुन, परीक्षार्थी बनविण्याऐवजी विचार करून उत्तरे देणारा गुणवान विद्यार्थी बनेल.

थोडक्यात, पालक जागृत झाले तर पालक-शिक्षक संघाच्या माध्यमातून वरील विषयाबाबत पुष्कळ करता येण्यासारखे आहे. जागृत पालक ही शिक्षण पद्धती बदलू शकतील यावर माझा दृढ विश्वास आहे. शासन-शिक्षणसंस्था यांच्यावर विसंबून राहून चालणार नाही.

या दृष्टीने सर्व शाळांतील पालक एकत्र येऊन पालक - शिक्षक संघटना समर्थ बनवतील व शाळेतील शिक्षणाचा चेहरा - मोहरा बदलण्यासाठी प्रयत्न करतील अशी आशा वाटते. ♦

# शिवरायांच्या भूमिकेत शंतनु मोघे

सध्या वेगवेगळ्या सिनेमांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा आणि त्यांच्या शूर मावळ्यांचा इतिहास पाहायला मिळतोय. महाराजांचा, त्यांच्या शिलेदारांचा पराक्रम, त्यांचं बलिदान तसंच शिवचरित्रातील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग या सिनेमांमधून मांडले जाताहेत. या चित्रपटांच्या निमित्तानं अनेक गुणी कलावंतांनी शिवरायांची व्यक्तिरेखा पडद्यावर साकारली. आता आगामी 'रावरंभा' या मराठी चित्रपटातून अभिनेता **शंतनू मोघे** हादेखील महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहेत. यापूर्वी त्यानं छोट्या पडद्यावर महाराजांची भूमिका साकारली होती. 'मी' स्वराज्य रक्षक संभाजी' मालिकेत साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं होतं. या भूमिकेचं गारुड आजही प्रेक्षकांच्या मनात असताना आता मोठ्या पडद्यावरही छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारायला मिळाल्याचा खूप आनंद आहे. ज्या उतुंग व्यक्तिमत्त्वानं आपला प्रेरणादायी इतिहास घडवला, समाजाला नवा विचार दिला, अशी भूमिका साकारताना मोठी सामाजिक जबाबदारीही नक्कीच असते, असं शंतनू सांगतो, 'रावरंभा' या सिनेमाचं दिग्दर्शन अनुप जगदाळे करतोय 'रावरंभा' चित्रपटाची पटकथा आणि संवाद प्रताप गंगावणेनं लिहीले आहेत. शंतनु मोघे हे सुप्रसिद्ध अभिनेते श्रीकांत मोघे यांचे सुपुत्र श्रीमती मृदुला आणि कै. सुहास मराठे यांचे जावई आहेत. अभिनेत्री प्रिया मराठे (पृ. २७७) हिचे शंतनु हे पती आहेत.



*म.टा. सोम. २० फेब्रुवारी २०२३*

♦

# गाव, गाथा, गजाली खाट कंदील मजाली

•संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६) भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

टिव्हीवर 'गाव गाथा गजाली' ही कोकणी कथांची मालिका सुरु होती.तेंव्हा बरेचदा वाटायचे की वऱ्हाडच्या पार्श्वभूमीवर काहीतरी लिहावे, पण विषय क्लिक होत नव्हता. या वर्षी दिपावली पुर्व साफ सफाई करतांना, शांताबाईची खोली खूप वर्षांपासून स्वच्छ करायची राहिली होती. ती स्वच्छ करायला घेतली. तशी आपल्या वाड्यात गीताबाईच्या नावाची ही खोली आहे. पण तिची साफसफाई नेहमीच होते म्हणून आधी शांताबाईंची खोली निवडली. या खोलीची साफसफाई करतांना बऱ्याच जुन्या वस्तू (टिक पीस) आढळल्या. जसे की, सत्तर एक वर्षापूर्वीचे दोन कंदील, साठ पासष्ट वर्षापूर्वीच्या दोन खाटा, एक आराम खुर्ची, विहिरीतून पाणी काढण्याचा दोर आणि खिराडी, दोन सुबक पण अर्धवट सामुग्रीचे टेबल लँप वगैरे वगैरे. कंदील आणि एक खाट चांगलीच होती. आराम खुर्चीची बसायची सतरंजीची पट्टी थोडी खराब आणि फाटली होती तेवढीच बदलावी लागली.बाकी कंदील, खाट आणि आरामखुर्ची स्वच्छ करून मोबाईलने फोटो काढले, व्हॉटसॲपवरही टाकले. हे फोटो बघतांना सहज कंदील आणि खाट यावर काहीतरी लिहावेसे वाटले. मोबाईलच्या स्क्रीनवरील कीपॅडवर बोटे शिवशिवू लागली आणि, गाव, गाथा, गजाली. खाट, कंदील मजालीचे लेखन आकार घेऊ लागले.

लहानपणी बरेचदा खाटेवर झोपलेलो आहे. उन्हाळ्यात रात्री गच्चीवर  लाकडी फळ्यांचे चार - पाच पलंग आणि दोन-तीन खाटा मिळून लहान मोठी धरून आठ-दहा जण गच्चीत झोपत असू. तसे वर्षभर खाटेवर नेहमी नियमितपणे झोपणारी व्यक्ती म्हणजे आमची आई. वयाच्या साठ बासष्ट वर्षानंतर नंतर आईला पाठ दुखीचा त्रास होऊ लागला म्हणून मोठ्या भावाने मुद्दाम तिच्यासाठी खाटेचाच फिल देणारा स्प्रिंगचा लोखंडी पलंग बनवून घेतला. नंतर याच सुमारास ज्यांच्या त्यांच्या खोलीत कुलर्स लागल्यामुळे उन्हाळ्यात गच्चीवर ऊन अंगावर येईपर्यंत झोपून राहण्याची मजाच गेली. या लेखाच्या निमित्ताने थोडा आढावा घेतला तेंव्हा आढळून आले की शहरातून आता खाट हद्दपार झाली आहे. खाट विणून देणारी आणि घरावरील कवेलू फेरून देणारी पिढीच आता जणू नष्ट झाली आहे. आता हे लोक केवळ खेड्यांत फारच थोड्या संख्येने उपलब्ध आहेत पण आधुनिकीकरणामुळे तिथेही हे काम मिळेनासे झाले आहे. त्यामुळे तेही आता शहरात येऊन मजुरीची कामे करतात. कोणी शहनाई, चौघडा वाजवतात. पण आता शहरातून ही शहनाई - चौघडा हद्दपार झाले आहेत. त्यांची जागा आधी बँडनी आणि नंतर ते ही मागे पडून त्यांची जागा कानठळ्या बसवणाऱ्या डी. जे.नी घेतली आहे. गावातून, शहरातून आणि मध्यमवर्गीय कुटुंबातून खाट जरी लयाला गेलेली असली तरी खेड्यापाड्यातून आणि हमरस्त्यावरील ढाब्यांवर तिचा थाट कायम आहे. एखाद्या हायवेवरील ढाब्यावर चहा नाश्त्याला थांबलो की ट्रक ढाब्यावर उभा करून खाटेवर मध्ये पाटली (फळी) टाकून ड्रायव्हर आणि क्लिनरला जेवतांना बघितले की इथे अजूनही खाटेचे महत्त्व अबाधित असल्याचे आढळून येते. पण तिथे ही खाटेची दोरी कायम असली तरी खाटेचे ठावे आणि गातं यांची जागा लोखंडी पाईपनी घेतल्याचे बऱ्याच ठिकाणी आढळून येते.

कंदीलाची कहाणी आणखीनच वेगळी आहे. खाट त्याच्या मानाने नशीबवान म्हणावी लागेल. एकतर शहरात आता कंदीलाचे अस्तित्वच नाही. ईलेक्ट्रीकची लाईन गेली तर ईन्व्हर्टर, चार्जेबल बल्ब, मेणबत्ती असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. शिवाय बॅटरीज, टॉर्च, मोबाईल अशी ही साधने आहेत आणि दुसरें म्हणजे, बहुधा गेलेली वीज लवकरच परतही येते. थोरा मोठ्यांच्या घरच्या वराती आणि मिरवणुकीत आढळणाऱ्या गॅसबत्त्याही आता नामशेष झाल्या आहेत. त्यांची जागा जनरेटरवर चालणाऱ्या रंगीबेरंगी दिव्यांच्या आकर्षक छत्र्यांनी घेतलेली आहे.आठवडी बाजारातील पेट्रोमॅक्स आणि जाता-येता नोकराला गॅसबत्तीला पंप मार रे ची आरोळी तर गेल्या अनेक वर्षात ऐकलेलीच नाही. आता स्मशानात प्रेत जाळायलाही जिथे लाकडे आणि रॉकेल मिळत नाही तर कंदील भरून घ्यायला रॉकेल कोठून मिळणार! घरी शांताखोलीत मिळालेला कंदील लाऊन पाहण्यासाठी आणि तसा त्याचा प्रज्वलित फोटो काढण्यासाठी जंग जंग पछाडतोय अगदी ब्लॅक मध्ये भरपूर पैसे देऊन १०० मी.ली. ही रॉकेल कुठे मिळत नाहीये. अंतयात्रेचे सामान मिळते तिथे आणि स्मशानात

ही विचारुन झालंय. कोळश्याच्या इस्त्रीने कपडे ईस्त्री करुन देणाऱ्यालाही विचारुन झाले. तो म्हणाला की कोळसे पेटवायला आम्ही डिझेल वापरतो, पण ते कंदीलात चालेल की नाही सांगता येत नाही. नाहीतर भडका उडायचा! खेड्यात कुठे मिळाले तर आणून देतो म्हणाला आहे. एकंदरीत रॉकेल मिळणार नाही असं दिसतयं. तेंव्हा हे लेखन कार्य दिवसाच्या उजेडात किंवा विद्युत दिव्याखालीच करावे लागणार असे दिसतय. रॉकेल कुठून आणि कसे मिळवावे याचा विचार करता करता लहानपणी वाचलेल्या ब्रॅन्डीची बाटलीच्या कथेची आठवण झाली.

मी कंदील, खाट, झोपडी आणि माणूस यांना एकत्रितपणे कधी बघितले होते का ते आठवू लागलो. १९७६ मध्ये डी.वाय. एड. करीत असतांना आमचा चांगापूरला कँप लागला होता. त्या कँपमध्ये स्काऊट अँड गाईड वर प्रात्यक्षिकासह व्याख्यान झाले होते. त्यात झोपडी आणि राहुटी कशी उभारायची याचे प्रात्यक्षिक दाखवले होते. पण त्यात प्रत्यक्षात राहणे किंवा त्यात प्रत्यक्षात कुणाला जीवन जगत असताना पाहण्याचे भाग्य १९८० च्या हिवाळ्यात आले. हा दुर्मिळ योग माझा जेष्ठ मित्र आणि पत्रकारितेतील मेंटॉर श्याम देशपांडे त्याच्या शाळेच्या गॅदरिंगसाठी विद्यार्थ्यांकडून 'सिग्नल' ही एकांकिका बसवत होता, तेंव्हा आला. मी त्याच्याकडून पत्रकारितेसोबत आणखीही बरेच काही शिकलो. त्यातील विशेष उल्लेखनीय म्हणजे जंगल भ्रमंती, पक्षीनिरीक्षण आणि नाट्य कलेतील दिग्दर्शन, नेपथ्य आणि ध्वनी व्यवस्थापन. मला शाळेत आठवीत शिकत असताना पासूनच नाट्यकलेने आकर्षित केलेले आहे. मी आठवी आणि नववीत दोन्हीही वर्षे शाळेच्या गॅदरिंगच्या एकांकिकेमध्ये भाग घेतला होता. नाटकाच्या आवडीमुळे नोकरी लागल्यावरही मी श्याम सोबत त्यांच्या शाळेच्या गॅदरिंगच्या एकांकिका आणि नाटकांच्या तालमींना जात असे. सिग्नल एकांकिकेसाठी श्याम सोबत सहाय्यक दिग्दर्शक म्हणून योगदान देत असताना मी नेपथ्य आणि ध्वनी व्यवस्थापनाकडे ही लक्ष पुरवत होतो. तालीमीच्या दरम्यान एक दिवस श्याम म्हणाला, आपल्याला एकांकिकेत साऊंड इफेक्टसाठी गाडीचा रुळावरून जाताना होणारा खडखडाट आणि गाडीच्या शिट्ट्या चे आवाज आपल्याला वापरायचे आहेत. त्यासाठी आपल्याला ते आवाज टेप करण्यासाठी जायचे आहे. मग काय, नेहमीच्या रात्रीच्या भटकंतीला टेपरेकॉर्डर सोबत घेऊन आम्ही दोघे आमची विजय सुपर स्कुटर घेऊन निघालो. बडनेरा ओलांडले आणि कच्च्या बैलबंडीच्या वाटेने रेल्वे लाईनला समांतर असणाऱ्या वाटेने टाकळीच्या दिशेने जाऊ लागलो. जवळच थोड्या अंतरावर आम्हाला रेल्वे गेटमनची झोपडी असलेले रेल्वे क्रॉसिंगचे फाटक दिसले. थोड्याच अंतरावर एका रपट्यावर रेल्वेचा एक पुलही होता. गेटमनची झोपडीवजा राहुटी जवळच होती, आणि गेटमनही आत होता. झोपडीत छानपैकी मस्त दोन कंदील होते. एक साधा ट्रॅडीशनल माझ्या घरी आहे तसा आणि दुसरा, एकीकडे जाड लाल आणि दुसरीकडे जाड हिरव्या रंगाच्या भिंगाचा काच असलेला. जो कंदील, गेटमन रेल्वे ड्रायव्हरला सिग्नल देण्यासाठी वापरायचा तो. गाडी यायला अवकाश होता. आम्ही मस्तपैकी त्या गेटमनशी गप्पांचा फड रंगवला. आम्हाला रेल्वेचे सिग्नल, गाडीद्वारे विविध प्रसंगी दिल्या जाणाऱ्या विशिष्ट शिट्ट्या यासंबंधी खूप नवीन माहिती मिळाली. स्टेशनला प्लॅटफॉर्मवरून गाडी सुटण्यापूर्वी दोनवेळा दिली जाणारी शिट्टीच यापूर्वी मला माहिती होती. पण फाटक आणि गेटमन नसलेल्या रेल्वे क्रॉसिंगला दिली जाणारी शिट्टी वेगळी, गेटमन आणि फाटक असणाऱ्या क्रॉसिंगला दिली जाणारी शिट्टी, गाडीने पुल ओलांडण्यापूर्वी दिली जाणारी शिट्टी, सिग्नल मिळाला नसेलतर दिली जाणारी शिट्टी, गाडी स्टेशनात प्लॅटफॉर्मवर लागण्यपूर्वी दिली जाणारी शिट्टी अशा विविध प्रसंगी दिल्या जाणाऱ्या शिट्ट्यांची माहिती आम्हाला गेटमनने दिली. थोड्याच वेळात आम्ही पुल ओलांडण्यापूर्वी दिली जाणारी शिट्टी आणि रेल्वे गेट क्रॉसिंग पूर्वी दिल्या जाणाऱ्या शिट्यांचे प्रत्यक्ष आवाजही टेपरेकॉर्डरवर टेपही केले. गेटमनशी गप्पा मारून झाल्यावर त्याने आग्रहाने पाजलेल्या बिनदुधाच्या चहाचा आस्वाद घेऊन आणि गाडीचा रुळाशी होणारा खडखडाट, दोन प्रकारच्या शिट्टीचे आवाज आणि रातकिड्यांचे विविध प्रकारचे आवाज टेप करून आमची मोहीम फत्ते झाली. 'सिग्नल' एकांकिकेला इतर अनेक पुरस्कारासोबत उत्कृष्ट साऊंड इफेक्टचा विशेष पुरस्कार ही मिळाला. असो आज कंदीलाच्या निमित्ताने एका खूप जुन्या आठवणीला उजाळा मिळाला.

कंदीलावर अभ्यास करून लोकमान्य टिळक, आगरकर, बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सारखे मोठे झालेले अनेक थोर विचारवंत आपल्याला माहिती आहेत. टिळकांनी रस्त्यावरील दिव्याच्या खांबाखाली बसून त्या उजेडात अभ्यास केल्याचे आम्हाला प्रथमिक शाळेत शिकत असतांना शिकवले होते. माझ्या प्रायमरी शिक्षणाच्या वेळी जरी आमच्या वाड्यात विजेचे दिवे आलेले होते, तरी लाईट्स जाणे हे तेव्हा अगदी नित्याची बाब होती. संध्याकाळी तर हमखास लाईन जायची. मी आळशी आणि अभ्यासात ढ असल्याने माझी बहिण सिंधुताई हिने अगदीच कंदीलाच्या नसला तरी चिमणीच्या उजेडात माझ्याकडून होमवर्क करवून घेतलेले आहे. त्याकाळी आमच्याकडे रॉकेलच्या दिव्याचे

प्रचलित असणारे सर्वच प्रकार उपलब्ध होते. ज्यात दोन कंदील, चार - पाच चिमण्या आणि दोन लँप ही होते. लाईन गेली की लवकर येत नसे त्यामुळे हे सर्वच प्रकार लावले जात. दर आठवड्याला त्यांच्या वाती आणि रॉकेल चेक केले जाई. लाईट गेले की एक कंदील माजघर, कम देवघर, कम दिवाणखाना, कम स्वयंपाक घरात लावला जाई. दुसरा गच्चीच्या वरवंडीवर जिना आणि गच्चीत प्रकाश पडेल असा स्थानापन्न होत असे. एक लँप मोठ्या भावाच्या (बाबांच्या) खोलीत आणि एक वडीलांच्या (नानांच्या) माडीत लावला जायचा. बाकीच्या ठिकाणी जेमतेम अंधार आहे येवढेच कळू शकेल असा प्रकाश पाडणाऱ्या चार, पाच चिमण्या लागायच्या. त्यातलीच एखादी चिमणी माझा अभ्यास घेण्यासाठी सिंधुताई उचलून आणायची. त्यामुळे खरंतर माझ्याही बाबतीत म्हणायला पाहिजे की मी जरी कंदीलाच्या उजेडात नसले तरी चिमणीच्या उजेडात माझे प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे.

शांता खोलीतील खाट, कंदील आणि आरामखुर्ची सुस्थितीत आणून घेतल्यानंतर माझ्या मनात विचार डोकावतोय की आता लवकरच पौष महिना लागतोय तेंव्हा मस्तपैकी धूंदूरमास साजरा करावा आणि सकाळी सकाळी भरीत, बाजरीची भाकरी, झुणका किंवा खरपूस पिठले आणि सोबत ठेचा, कांदा असा मेनू बनवून मित्रांसोबत बगिच्यात खाटा आणि त्यावर फळ्या (पाटल्या) टाकून आणि आरामखुर्चीत रेलून कंदीलाच्या उजेडात धुंदूरमास साजरा करावा. आपणांसही आमंत्रण आहे पण सोबत कंदील प्रज्वलित करण्यासाठी रॉकेल आणायचे तेवढे लक्षात असू द्या. हा बेत पूर्णत्वास जाईल तेव्हा जाईल. पण तोपर्यंत स्वप्नात याचे चित्र रंगवून मनातल्या मनात मांडे खायला कोणाची हरकत नसावी. तेव्हा त्यासाठी तरी कंपनी देऊ शकता.

असो, माझे गाव, गाथा, गजाली - खाट कंदील मजाली लेखन आवडले तर माझ्या नावासह शेयर करायला विसरु नका.

srmatathe53@gmail.com

♦

# ‘चहा’बाज

दोस्तांनो, दिवसाची सुरुवात होते ती फक्त दोनच गोष्टींनी एका हातात वर्तमानपत्र आणि दुसऱ्या हातात वाफाळलेला चहा. अनेकांना तर चहाची तल्लफ आली की बाकी काहीच सुचेनासं होतं. परंतु, एरव्ही ‘यूज अण्ड थ्रो’ म्हणून हिणवल्या जाणाऱ्या चीनमध्येच या चहाचा शोध लागला. इसवी सन पूर्व २७३७ मध्ये चीनमधील राजा शेन नुंग हा शिकारीला बाहेर पडला असताना पहिला चहा तोच प्यायल्याचं सांगण्यात येतं.



त्याचं झालं असं की, शेन नुंग नेहमीप्रमाणे शिकारीला निघाला होता. पायपीट करुन दमल्यानंतर शेन नुंग विश्रांतीसाठी थांबला. वातावरणात गारठा होता, जोराचा वारा सुटला होता. शेन नुंगच्या सेवकांनी त्याच्या श्रमपरिहारासाठी पाणी गरम करायला ठेवलं. थोड्याच वेळात शेन नुंगला गरम केलेल्या पाण्यातून एकप्रकारचा सुगंध येत असल्याचं जाणवलं. तो पुढे सरसावला. पाण्यात जवळच असलेल्या एका झाडाची पानं पडली होती. या आगळिकीसाठी आपल्याला शिक्षा होणार, या विचाराने त्याचे सेवक घाबरले. राजाने जवळ जाऊन त्या पाण्याचा वास घेतला. तो खरोखरीच विलक्षण होता. ते पाणी थोडंसं चाखल्यानंतर त्याच्या चवीने तो हरखून गेला. त्या पाण्याने त्याला कमालीची तरतरी आली आणि थकवा कुठच्या पळून गेला. तेव्हापासून जगाला पाण्यानंतर सर्वाधिक प्यायलं जाणारं एक लोकप्रिय पेयच मिळालं.

आता राजाने एखादी गोष्ट केली तर त्याचं अनुकरण प्रजा करणारच. मग या झाडाच्या पानांची रीतसर लागवड सुरु झाली. ताजी पानं नेहमीच मिळत नसल्याचं पाहून त्याची पूड करुन ती अधिक काळापर्यंत साठवता येईल, अशी पद्धतही विकसित केली गेली. जगाला या पेयाविषयी माहित झालं ते सोळाव्या शतकात पोर्तुगीज धर्मगुरु आणि व्यापाऱ्यांनी या चहाची चव चाखली आणि त्यांनाही त्याचं वेड लागलं तेव्हा. त्यावेळी चीनमध्ये या झाडांपासून तयार करण्यात आलेल्या पेयाला चा असं म्हटलं जाई. मग हे चहाच्या झाडांच्या लागवडीचं तंत्र ब्रिटनने अक्षरशः एक मोहीम राबवून चीनमधून चोरलं आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून हे चोरलेलं तंत्र आसाममध्ये अवतरलं ते १९ व्या शतकाच्या अखेरीस. त्यानंतर आपल्या देशात चहाची लोकप्रियता वाढतच गेली. ईशान्येकडील आसाम आणि दक्षिणेतील काही राज्यांमध्ये चहाची लागवड जोरात सुरु झाली. कधीकाळी केवळ मौजेसाठी आणि श्रीमंताच्या हातात असलेलं पेय सर्वसामान्यांच्या घरी पोहोचलं. पण या चहाचे अनेक दुष्परिणाम लोकांसमोर आलेले आहेत, त्यामुळेच लहान मुलांना यापासून दूर ठेवलं जातं. ♦

लेखांक ५

# इच्छापत्र : अपरिहार्य पण दुर्लक्षित दस्तावेज

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**स्त्रिया आणि इच्छापत्रे :**

हिंदू वारसाहक्क कायदा १९५६ मधील कलम १४ ते १६ यांत विनाइच्छापत्र मृत झालेल्या हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेच्या वारसाहक्कासंबंधी विवेचन आहे.

- कलम १४ मधील तरतुदीनुसार, वाटप करताना हिंदू पुरुषाच्या मालमत्तेच्या **वडिलार्जित आणि स्वकष्टार्जित या दोन वर्गातील मालमत्तांच्या वाटपांविषयी असलेला भेदभाव हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेच्या बाबतीत केला जात नाही.** म्हणजेच स्त्रीची मालमत्ता, तिचं स्त्रीधन, स्वकष्टार्जित, वडिलोपार्जित, भेट, दान, पोटगीद्वारे किंवा वारसाहक्काने मिळालेली किंवा इतर कोणत्याही प्रकारे मिळवलेली असली तरी या सर्वांना एकच नियम लागू होतात. मात्र सासरे वा पती यांच्याकडून वारसाहक्काने मिळालेली आणि आई/वडिलांकडून वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता यांच्या वाटपासाठी मात्र वेगवेगळे नियम आहेत.
- कलम १५ (१) मध्ये वारसांमधील प्राधान्याचे नियम आहेत त्यानुसार
  - पती, पुत्र, कन्या (शिवाय मृत पुत्र/कन्येची मुले)
  - आई आणि वडील
  - वडिलांचे वारस
  - आईचे वारस असा प्राधान्यक्रम आहे.
- कलम १५ (२) अन्वये सासरे/पती व आई/वडील यांच्याकडून वारसाहक्काने मिळालेल्या मालमत्तांच्या वारसाहक्कांच्या प्राधान्यक्रमासंदर्भात पुढील प्रावधान आहे.

  **आई/वडिलांकडून वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता.** प्रथम प्राधान्य पुत्र/कन्या/मृत पुत्र/कन्या यांची मुले आणि नंतर पित्याचे वारसदार

  **सासरे/पतीकडून वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता.** प्रथम प्राधान्य पुत्र/कन्या/मृत पुत्र/कन्या यांची मुले आणि नंतर पतीचे वारसदार
- कलम १६ मध्ये वाटपाच्या पद्धतीसंबंधी (लाभार्थींना मिळणाऱ्या हिश्श्यांबद्दल) विवेचन आहे.
- अर्थात कोणतीही हिंदू स्त्री आणि हिंदू पुरुष देखील इच्छापत्राद्वारे आपल्या मालमत्तेचे वाटप इच्छित व्यक्तींना करू शकते/शकतो आणि तिने/त्याने ते जरूर करावे.

**अनिवासी भारतीय व्यक्ती आणि इच्छापत्रे :**

व्यक्ती अनिवासी भारतीय (NRI म्हणजे Non Resident Indians) असल्यास पुढील सूचना :

- अशा व्यक्तींनी भारत वगळता इतर देशांत मालमत्ता असल्यास त्या त्या देशातील प्रचलित कायद्याप्रमाणे तेथील मालमत्तेविषयी इच्छापत्र करावे अथवा त्या देशात मान्यता असल्यास **वैश्विक इच्छापत्र (Global Will)** करावे व भारतातील मालमत्तेसाठी वेगळे. येथील कायद्यास अनुसरून इच्छापत्र करावे.
- मालमत्ता एकापेक्षा जास्त देशांत असल्यास व वैश्विक इच्छापत्र केल्यास त्यातील तरतुदी निवासी देशाच्या व संबंधित देशांच्या कायद्याच्या कक्षेत बसतील ही काळजी घ्यावी.
- लाभार्थी परदेशी नागरिक असेल किंवा परदेशी स्थायिक भारतीय नागरिक असेल किंवा अनिवासी भारतीय नागरिक असेल तर अशांना लाभार्थी करताना विशेष काळजी घ्यावी.

**इच्छापत्रासंबंधित काही विशेष आणि काही मनोरंजक मुद्दे:**

- इच्छापत्र त्याच्या कर्त्याच्या मृत्युनंतर अंमलात येते. परंतु अगोदरच इच्छापत्र केलेले असले तरी कर्ता त्याच्या मृत्युपर्यंत स्वतःच्या इच्छेप्रमाणे आपल्या मालमत्तेचा विनियोग किंवा वाटप करू शकतो. इच्छापत्रात नमूद मालमत्ता जर मृत्युच्या वेळी अस्तित्वात नसेल तर तिच्या बाबतीतले निर्देश अवैध ठरतात. मात्र Codicil करून आपल्या इच्छेप्रमाणे योग्य आणि आवश्यक बदल करू शकतो. शक्यतो पुढील वाक्य इच्छापत्रात असावे : **The bequest (s), in respect of asset (s), which are liquidated/encashed/**


**sold off after the writing of the WILL or may not exist as on the date of my death of my death for any other reason, should be treated as null and vold.**

- **आजमितीला इच्छापत्राद्वारे प्राप्त मालमत्तेवर कोणत्याही प्रकारची** Estate Duty **देय नाही.**
- याआधीच उल्लेख केल्याप्रमाणे नामांकन असलेल्या व्यक्ती आणि जीवित संयुक्त खातेधारक हे त्या **(जीवन विम्याखेरीज इतर सर्व)** मिळकतींचे **विश्वस्त असतात मालक नव्हे.** जीवित संयुक्त खातेदार व नामांकन असलेली व्यक्ती यामध्ये संयुक्त खातेदाराला प्राधान्य मिळते व मृत व्यक्तीच्या नांवे असलेली मिळकत त्याला बहाल केली जाते. सर्व संयुक्त खातेदारांचे निधन झाल्यावर मग नामांकन असलेली व्यक्ती विचारात घेतली जाते. या सर्व कारणाने **संयुक्त खातेदार आणि नामांकन मिळालेली व्यक्ती हे केवळ विश्वस्त असल्याने, त्यांनी, इच्छापत्र असल्यास त्याप्रमाणे किंवा नसल्यास मृत व्यक्तीस लागू असलेल्या वारसाहक्क कायद्याप्रमाणेनुसार असणाऱ्या वारसांकडे मालमत्ता सुपूर्द करणे अपेक्षित आहे.** पहा : https://housing.com/news/important-ruling-property-rights-successors-versus-nominees/
- नामांकन व इच्छापत्र याबाबत संभ्रम वा तंटा झाल्यास इच्छापत्रास कायदेशीर प्राधान्य मिळते.
- इच्छापत्र करणारी व्यक्ती अविवाहित व पारशी किंवा ख्रिश्चन असेल तर विवाहानंतर ते इच्छापत्र अवैध ठरते.
- इच्छापत्रातील तरतुदी जर कर्त्याच्या मृत्युनंतर घडू शकणाऱ्या घटनांवर आधारित असतील तर तसेच कायदा व नैतिकतेच्या कक्षेत न येणाऱ्या असतील तर अशा तरतुदी अवैध गणल्या जातात. उदा. कर्त्याच्या मृत्युसमयी जर 'क्ष' अविवाहित असेल तर 'मी रु. ५०,०००/- 'क्ष'च्या मुलाच्या नावाने करीत आहे' किंवा 'क्ष' ने 'य'चा खून केल्यास त्याला रु. ५०,०००/- देण्यात यावेत, असे वाटप अवैध ठरेल.
- अशा अवैध वाटपांची सूची (invalid bequests) भारतीय वारसाहक्क कायदा १९२५, भाग VI, प्रकरण VII, कलम ११२ ते ११८ यात दिली आहे.
- Payment of Stamp Duty आणि धर्मादाय न्यासासंबंधित कायदे वगळता वारसाहक्कांसंबंधी इतर बहुसंख्य कायदे भारतातील सर्व राज्यात समानतेने लागू आहेत.
- बँकातील खाती, त्यातील व्यवहार, खाती बंद करणे/नामांकन करणे यासंबंधित प्रक्रिया जाणण्यासाठी पहा : https://www.rbi.org.in/SCRIPTs/BS_View/MasCirculardetails.aspx?id=8984

***(क्रमशः)***

---

## सहवेदना



माझ्या आईची आत्येबहीण आपल्या मराठे परिवारातील श्रीमती गायत्री सुरेश मराठे ह्यांचे निधन ३१/१/२०२३ ला झाले. पती- सुरेश कृष्ण मराठे, निधन-१५/११/२००६, रहाणार- लोकमान्य नगर सोसा. माहीम. तिच्या पाठीमागे एक मुलगा - पुनीत सुरेश मराठे, पूर्वाश्रमीची मंगला कृष्ण पोंक्षे, जन्म १४/५/१९५२, सोलापूर, शिक्षण - बी. ए., वडील - कृष्ण दत्तात्रय पोंक्षे, इंजिनीअर, सोलापूर. नंतर निवास- डोंबिवली. विवाह-२७/५/१९७८.श्रीमती गायत्री मराठे यांचे चुलत सासरे भाऊसाहेब मराठे. ते फिशरीज मधले एक्सपर्ट होते.

सौ. प्राजक्ता राजेश कुलकर्णी, पुणे

**श्रीमती गायत्री सुरेश मराठे यांना मराठे प्रतिष्ठानद्वारा भावपूर्ण श्रद्धांजली.**

## होळी

रंगाच्या धारेत रोजच भिजतो आपण
निळ्याच्या छबीत रोजच सजतो आपण
मनामनाच्या रंगांचा रोजच घेतो आनंद
वाईट प्रवृत्तीच्या दहना करतो आज प्रारंभ
पांढऱ्याच्या आसक्तीत... किती रंग रंगतो आपण
रोजच रंगतो नव्या रंगात...
तरीही...
आनंदाचा रंग कायम ठेवतो आपण
होळीच्या रंगीबेरंगी शुभेच्छा!




**कवयित्री - श्रीमती संध्या खांबेटे,** ठाणे (पृ. ६२६)
*(शब्दसुमन - कविता संग्रहातून)*
भ्रमणध्वनी - ९८६७०७२२४६

# कुलवृत्तांत - आव्हान पेलतांना

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२), दादर, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

**मा**र्च २०१९ च्या हितगुजच्या ११७ व्या अंकात म्हणजे बरोबर ४ वर्षांपूर्वी मी कुलवृत्तांत-एक आव्हान हा लेख लिहिला होता. (पहाः https://maratheprtishthan.org/hitgujpdfshow.php?id=113&&pageno=4)) सुमारे ९२ चित्पावन आडनावे वगळता इतर चित्पावनच नव्हे तर इतर ज्ञातींमध्ये असलेली या विषयीची अनास्था पाहता गोडबोले कुलवृत्तांतातील 'वरुणराज चिंतामणी भिडे' यांच्या कुलवृत्तांताचे महत्व सांगणाऱ्या लेखाची लिंक देण्याचा मोह आवरत नाही. https://marathepratishthan.org/otherkulavruttant.php अशा या महत्वाच्या ग्रंथाच्या संगणकीकृत आवृत्तीच्या प्रकाशनाची धुरा आपले दिवंगत विश्वस्त कै. सी. गो. खांबेटे यांच्याकडून घेतांना मी पाहिलेल्या स्वप्नाच्या पूर्ततेचा आनंद साजरा करण्याचा क्षण आज ठीक ४ वर्षांनंतर दृष्टीपथात आला आहे. मधली कोविडची दोन वर्षे जवळजवळ फुकट गेली असं मानलं तरीही या प्रकल्पासाठी उर्वरित दोन वर्षे हा तसं पाहता बराच जास्त काळ! लगेचच म्हणजे एप्रिल २०१९ मध्ये एका सॉफ्टवेअर डेव्हलपर कडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे २०२० च्या जून पर्यन्त हा प्रकल्प पूर्ण करण्याची आशा दृगोच्चर झाली होती. मात्र प्रकल्पाला मे २०१९ मध्ये सुरुवात झाल्यानंतर सप्टेंबर २०२० मध्ये सुमारे दीड वर्षाने कोविड, माझा परिपूर्णतेचा ध्यास आणि डेव्हलपरला आलेल्या समस्या याच्या एकत्रित परिणामामुळे या स्वप्नाचा दुःखद अंत झाला. मग पुनः सुरू झाला शोध नव्या डेवलपरचा! कोणाच्याही इच्छेविरूद्ध त्याच्याकडून झालेले काम समाधानकारक होऊ शकत नाही याचा पुनः प्रत्यय आला. अर्थात कोविडमुळे निर्माण झालेली परिस्थिति देखील त्याला कारण असू शकेल. पण अखेर दुसऱ्या डेवलपरकडूनदेखील जेव्हा इच्छित कार्य तडीस जात नसल्याची खात्री पटली तेव्हा पुनः 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिति आली. मात्र मार्च २०२२ मध्ये कुलवृत्तांत ही संकल्पना आणि तिचं महत्व संपूर्णपणे कळलेल्या एका व्यक्तीने हा प्रकल्प ६ ते ९ महिन्यांत आपल्या संकल्पनेप्रमाणे प्रत्यक्षात आणण्याची तयारी दाखवली आणि त्याचं फलित म्हणजे लवकरच ह्या प्रणालीचं डेव्हलपरकडून मराठे प्रतिष्ठानकडे हस्तांतरण होणे अपेक्षित आहे. मात्र जुन्या छापील कुलवृत्तांतातील माहिती या नव्या प्रणालीमध्ये भरून झाल्यावर मगच या प्रणालीद्वारे आपले कुलबांधव आणि भगिनी आपापली माहिती भरू शकतील.




**प्रणालीचं स्वरूप आणि कार्यपद्धती :**

प्रणालीत प्रवेश: मराठे कुळात समाविष्ट सर्व आडनावांच्या व्यक्ती तसेच इतर कोणतीही व्यक्ती मराठे प्रतिष्ठानचे संकेतस्थळ marathepratishthan.org वरील Kulvruttant>Family Tree या टॅबसवर क्लिक करून या प्रणालीत प्रविष्ट होऊ शकेल. प्रणालीतील सर्व सुविधा कुळातील व्यक्तींना उपलब्ध. मात्र इतर व्यक्तींसाठी Access Rights वर काही बंधने आहेत. त्यांचा ऊहापोह नंतर केला आहे.

**प्रणालीची वैशिष्ट्ये:**

आजवर १०/१२ चित्पावन आडनावांचे कुलवृत्तांत विविध संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत. मात्र त्यांचे स्वरूप मात्र घराणी, त्यांची संक्षिप्त माहिती, त्यांतील व्यक्तीचा शोध आणि इच्छित व्यक्तीच्या नावावर क्लिक करून त्या व्यक्तीची माहिती पाहणे एव्हढ्यापुरतेच मर्यादित आहे. वंशावळ (Family Tree) एकाही कुलवृत्तांतात उपलब्ध नाही. याउलट आपल्या कुलवृत्तांतात वंशावळी तसेच पुढील वैशिष्ट्यपूर्ण सुविधा आहेत, ज्यापैकी बहुतेक सर्वच इतर कुलवृत्तांतात नाहीत. सोबतचा Screen

Shot पहावा.

१) प्रत्येक घराण्याची वंशावळ (पुरुष आणि स्त्रिया दोघेही दृश्य स्वरुपात) प्रवाही म्हणजे Dynamic स्वरुपात उपलब्ध. म्हणजे आज व्यक्तीची माहिती (प्रोफाइल) भरल्यास दुसऱ्या दिवशी वंशावळीत स्थान.
२) वंशावळ zoom in किंवा zoom out करता येणे शक्य.
३) वंशावळीतील प्रत्येक व्यक्तीच्या Icon वर तिचा संक्षिप्त परिचय. त्या Icon वर क्लिक केल्यास केवळ त्या व्यक्तीची वंशावळ दिसेल.
४) कुलवृत्तांत मराठी आणि English दोन्ही भाषांत दिसेल. भाषेची निवड प्रणालीचा वापर करणारी व्यक्ति करेल.
५) अनेक चित्पावन कुळांचे कुलवृतांत एकमेकांशी जोडता येणे शक्य. इतर कुळांच्या अनुमतीनंतर ते शक्य झाल्यास, भविष्यात विवाहसंबंध, रोजगाराच्या संधी याविषयीची माहिती, खरेदी विक्री तसेच आवश्यक सेवा यांचे आदानप्रदान (आर्थिक व्यवहार वगळता) आदि व्यवहार Online पद्धतीने करता यावेत यादृष्टीने प्रावधान.
६) या कारणाने, तसेच प्रतिष्ठानच्या शैक्षणिक/ वैद्यकीय मदत या योजनांना पूरक अशी माहिती मिळण्यासाठी प्रत्येक व्यक्तीच्या सुमारे १०० विविध पैलूंविषयी माहितीचे गठन.
७) अशी माहिती एकावेळी भरणे, त्यासाठी लागणाऱ्या वेळामुळे कष्टप्रद होऊ शकेल हे लक्षात घेऊन माहितीचे ६ वर्ग ज्यामुळे सर्व माहिती हप्त्याहप्त्याने भरणे शक्य. हे ६ वर्ग असे. १) मूलभूत माहिती, २) निवासस्थाने, ३) कारकीर्द, ४) सन्मान, ५) आरोग्य आणि ६) कुटुंब. याविषयी अधिक माहिती नंतर दिली आहे.
८) माहिती गुप्त राखणे: पत्ता, जन्म/विवाह/मृत्यू दिनांक, भ्रमणध्वनि/ई-मेल, व्यंग, आजार, शस्त्रक्रिया ही माहिती नेहमीच गुप्त राहील (इतर तसेच मराठे कुळातील व्यक्तींसाठी सुद्धा.) मात्र ती खुली करण्याची मुभा सर्वस्वी प्रोफाइल ज्याचे आहे त्या व्यक्तीच्या आधीन.
९) प्रत्येक व्यक्तीच्या प्रोफाइल मध्ये तिच्या सर्व कुटुंबियांची (जाडीदार, मातापिता, आजोबाआजी, भाऊबहिणी, पुत्र आणि कन्या) नावे समाविष्ट. व्यक्तीच्या On Screen प्रोफाईलच्या खालीच त्या व्यक्तीच्या पित्याची पुढील ४ ते ७ पिढ्यांची वंशावळ दिसू शकेल ज्यात आपल्या इच्छेनुसार भावंडांचा समावेश करणे किंवा त्यांना वगळणे शक्य.
१०) प्रणालीच्या पहिल्या पानावर मराठे कुळातील व्यक्तींच्या माहितीचे संक्षिप्त वर्गीकरण.
११) उपलब्ध माहितीचे निवासस्थाने, नावे, वयोमान, कुटुंबव्यवस्था, शिक्षण, व्यवसाय या आणि अशा अनेक प्रकारे वर्गीकरण आणि विश्लेषण. कुलवृत्तांतातील माहितीचा कालावधी हा सुमारे १६५० ते आजतागायत असा आहे. काही विश्लेषणात्मक तक्ते कालानुरूप आहेत. सुरुवातीस काही निवडक पैलूंविषयी असले तरी भविष्यात अधिक प्रकारे असे विश्लेषण शक्य.

**प्रणालीचा वापर**

१) १९९२ च्या कुलवृत्तांतातील सर्व पुरुषांची नावे आणि त्यांची जन्म/मृत्यू वर्ष (उपलब्ध असल्यास), निवासस्थाने, घराणे पिढी यांची माहिती, त्यांची पिता-पुत्र नाती, तसेच पुत्र, कन्या, जोडीदार यांची संख्या ही माहिती या प्रणालीत भरली गेली आहे. यामुळे सर्व स्त्रियांची केवळ प्रोफाईल्स (templets) बनली असून, पुरुषांची उर्वरित माहिती म्हणजे शिक्षण, व्यवसाय, छंद, आरोग्यविषयक उपलब्ध माहिती आणि स्त्रियांची सर्व उपलब्ध माहिती भरणे आवश्यक आहे. हे काम सध्या सुरू आहे. कदाचित ठरलेल्या मुहूर्तापर्यंत ते पूर्ण होऊ शकणार नाही.
२) Registration च्या वेळीच व्यक्ति मराठे कुळातील आहे किंवा नाही याची शहानिशा करून (व्यक्तीशी ADMIN ने video कॉल द्वारे संभाषण करून ओळख पटवून घेतल्यानंतर) त्याप्रमाणे व्यक्तीला विविध अधिकार देणे किंवा नाकारणे शक्य.
३) व्यक्ति मराठे कुळातील असल्यास आणि तिचे नाव छापील कुलवृत्तांतात उपलब्ध असल्यास व्यक्ति आपला ID आपल्या प्रोफाइल बरोबर link करू शकेल. नसल्यास ADMIN च्या सहाय्याने आपले वंशावळीतील स्थान निश्चित केल्यावर व्यक्ति आपले प्रोफाइल बनवू शकेल.
४) व्यक्ती केवळ तिचे स्वतःचे प्रोफाइल बनवू किंवा update करू शकेल (पत्नी/ पती, मुले यांचेसुद्धा नाही) मात्र अपवाद म्हणजे आई, वडील, आजोबा, आजी यांची प्रोफाईल्स. व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याविषयीची माहिती भरणे आणि आधी अप्रसिद्ध असलेली माहिती नंतर समजल्यास ती भरण्याची सुविधा याद्वारे उपलब्ध केली आहे.
५) व्यक्तिशोध - व्यक्तीचे नाव, पित्याचे नाव, आजोबांचे नाव, घराणे, पिढी, लिंग, राहण्याचे ठिकाण, पिनकोड आदि किंवा यापैकी कोणत्याही माहितीने शोध शक्य. मात्र शोधानंतर त्याच नावाच्या अनेक व्यक्ति दिसणे टाळण्यासाठी यापैकी अधिकाधिक माहिती देणे शक्य, माहिती देणे योग्य!

६) व्यक्तीचे प्रोफाइल: व्यक्तिशोध केल्यानंतर दिसणाऱ्या कार्डवर क्लिक करून प्रोफाइल दिसू शकेल जे प्रिंट करता येईल. मात्र डाउनलोड करता येणार नाही. या onscreen printable प्रोफाइल मधील नात्यांतील इतर व्यक्तींच्या नावावर क्लिक करून त्या त्या व्यक्तीचे प्रोफाइल दिसू शकेल.

७) पुत्र किंवा कन्या यांना आपले प्रोफाइल केवळ पित्याच्या प्रोफाइल मधील कुटुंब या Tab वर, नंतर जोडीदार वर क्लिक करून Add Son किंवा Add Daughter वर क्लिक करून आणि पत्नी Add Spouse वर क्लिक करून बनवता येईल.

८) प्रोफाइल मधील माहिती अशी असेल.

**मूलभूत माहिती:**

यात व्यक्तीचे घराणे, पिढी, लिंग, स्वतः, वडील, आजोबा यांची नावे, भ्रमणध्वनी, ई-मेल आयडी, जीवित, वैवाहिक, दत्तक स्थिती, पत्नीचे माहेरचे तर कन्यांचे सासरचे संपूर्ण नाव, जन्म/ विवाह/ मृत्यूचे दिनांक, राष्ट्रीयत्व, धर्म, जात, गोत्र, (स्त्रियांचे देखील) चांद्ररास, सौररास, रक्तगट, डोळे/ त्वचेचे रंग, मातृभाषा, वजन, ऊंची, जन्मस्थळ, मृत्यूस्थळ, पर्यायी भ्रमणध्वनी, ई-मेल आयडी, FB, Instagram, Linkedin, Twitter च्या लिंक्स, छापील कुलवृत्तांतातील पृष्ठ क्र., संपूर्ण आणि संक्षिप्त नाव, व्यक्तीविषयक इतर विशेष माहिती (असल्यास) इत्यादीचा समावेश. यातील बहुतेक माहिती ड्रॉपडाऊनद्वारे घेतली जाईल.

**निवासस्थाने:** वेळोवेळी व्यक्तीचा निवास असलेली स्थळे (विभाग/गाव, जिल्हा/शहर, राज्य, देश) त्यातील शेवटच्या निवासस्थानावर ✓ अशी खूण

**कारकीर्द:** यात शिक्षण (स्तर आणि श्रेणी), व्यवसाय (प्रकार, क्षेत्र, स्तर) आणि छंद / उपक्रम (क्षेत्र, उपक्रम) यांची (ड्रॉपडाऊनद्वारे माहिती). सर्वात recent माहितीवर ✓ अशी खूण.

**सन्मान:** यात व्यक्तीचे कर्तृत्व (मिळालेली पारितोषिके सन्मान, पुरस्कार आदी), आणि सामाजिक कार्य याविषयी वरीलप्रमाणे माहिती.

**आरोग्य:** यात व्यक्तीचे आजार, शस्त्रक्रिया, व्यंग याविषयी माहिती.

**कुटुंब:** यात मातापिता, जोडीदार, पुत्र, कन्या, भाऊ आणि बहिण या सर्वांची नावे असतील. त्या नावावर क्लिक करून त्या व्यक्तीचे प्रोफाइल दिसेल.

**वंशावळ :** हा आपल्या कुलवृत्तांतातील सर्वात महत्वाचा घटक. घराण्याच्या यादीतील इच्छित घराण्यावर क्लिक करून त्या घराण्याची माहिती तसेच त्या घराण्याची वंशावळ दिसू शकेल. याविषयी अधिक माहिती वर दिली आहेच.

माहितीचे विश्लेषण आणि विवरण: अधिक माहिती वर दिली आहे.

**मराठे कुळातील व्यक्तींसाठी उपलब्ध गोष्टी:**

१) सर्व घराण्यांची माहिती अर्थात घराण्याचे प्रोफाईल- उदा. छापील कुलवृत्तांतातील घराण्याविषयीची ऐतिहासिक माहिती, त्यांच्या कुलदेवता, कुळाचार, तसेच घराण्यांतील गणमान्य व्यक्तींची प्रोफाइल्स इच्छित घराण्यावर Click करून मिळेल.

२) या प्रोफाईल मध्ये दिसणाऱ्या कुलदेवता, कुलाचार आणि गणमान्य व्यक्ती यांच्या नावावर Click करून त्यांची माहिती मिळू शकेल.

३) घराण्याच्या प्रोफाईलच्या अखेरीस असलेल्या वंशवाळीच्या Tab वर Click करून वंशावळ पाहता येईल. मात्र लागणारा वेळ घराण्यातील व्यक्तींच्या संख्येवर अवलंबून असेल.

**इतर कुळातील व्यक्तींसाठी उपलब्ध गोष्टी:**

इतर कुळातील व्यक्तींसाठी वरील सर्व सुविधा त्यांतील अपवादासह उपलब्ध आहेत. मात्र वंशावळी किंवा व्यक्तींची प्रोफाईल्स यामधील सर्व नावे संक्षिप्त स्वरूपात दिसतील. उदा. वामन श्रीधर खांबेटे हे नाव Wxxxx Sxxxx Khambete आणि वxxxx सxxxx खांबेटे. अर्थातच अशी व्यक्ति आपले प्रोफाईल बनवू किंवा अपडेट करू शकणार नाही.

या प्रकल्पासाठी सर्व विश्वस्त आणि कार्यकरिणीच्या सर्व सभासदांनी मला सर्वाधिकार दिले होते. त्याप्रमाणे मी तरुण पिढीतील सौरभ धनंजय (पुणे), शशांक शाम (बेळगावी), प्रसाद वसंत (गोवा), प्रदीप अनंत (गोवा), राहुल विदवांस (कल्याण) आणि आधीच्या पिढीतील धनंजय वासुदेव (पुणे), माधव मधुकर (पुणे) यांची एक टीम केली. त्यातील सर्वांचीच मदत मोलाची. विशेषतः सौरभने प्रथमपासून System Design साठी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय सुमारे १५ व्यक्ती, ज्यात मुंबई आणि पुणे येथील बहुसंख्य कार्यकारिणी सदस्य, तसेच दिलिप वसंत (मुंबई), संजय दिगंबर खांबेटे (पुणे), समीर विलास (ठाणे), विश्वेश विठ्ठल (सांगली), गणेश अनंत (शिरूर), अरुण शिवराम(गोवा) आदींनी या प्रकल्पासाठी समन्वयक म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. या सर्वांचा मी वैयक्तिक रित्या आणि समिति प्रमुख या नात्याने शतशः ऋणी राहीन.

♦

# श्रीधरस्वामी नाझरेकर यांची दत्तभक्ती

## (शके १५८०-१६५१)

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

आपली आख्यानक कविता जनसामान्यांपर्यंत सुबोध आणि रसाळ भाषेतून पोचवून उद्बोधनाचा हेतू सिद्धीस नेणारे श्रीधर हे आनंद संप्रदायी कवी होत. श्रीधरस्वामी नाझरेकर इ.स.१६५८ (शके १५८०) मध्ये पंढरीस जन्मले. श्रीधरांचे घराणे सदाचरणी, धार्मिक वृत्तीचे होते. ग्रंथलेखनाचा वारसा श्रीधरांना त्यांच्या पिता व पितामहांकडून मिळाला. श्रीधरांचे वडील ब्रह्मानंद यांनी 'आत्मप्रकाश' (इ.स.१६८१ / शके १६०३) हा ग्रंथ लिहीला.

श्रीधरस्वामींनी, दत्तात्रेय-सदानंद-रामानंद-अमलानंद-गंभीरानंद- ब्रह्मानंद-सहजानंद-पूर्णानंद-दत्तानंद-ब्रह्मानंद-श्रीधर अशी आपली आनंदसंप्रदायी गुरूपरंपरा सांगितली आहे. श्रीधरांचे बहुतांश ग्रंथलेखन पंढरपूरलाच आहे. हरिविजय, श्रीरामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत हे त्यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ. याशिवाय वेदान्तसूर्य, श्रीपंढरीमाहात्म्य, श्रीज्ञानेश्वरचरित्र, मल्हारीविजय ही छोटी प्रकरणे आणि काही स्फुटलेखनही त्यांनी केले आहे. पूर्णानंदांचे नातशिष्य रंगनाथस्वामी हे श्रीधरांचे चुलत चुलते असून तेच त्यांचे विद्यागुरुही होते.

श्रीधरांच्या प्रचंड ग्रंथसंभारात दत्तभक्तीचा धागाही गुंफला गेलेला दिसतो. उदाहरणार्थ, श्रीधरांनी दत्तात्रेय भक्तीमुळे आपल्या, शके १६२५ मध्ये रचिलेल्या 'रामविजय' ग्रंथात एक नवा प्रसंग कल्पिला आहे. वनवासाच्या प्रारंभकाळी अनेक ऋषींच्या आश्रमांना भेटी देत देत जेव्हां राम आत्रींच्या आश्रमांत येतो, तेव्हा त्याला दत्तात्रेयाचे दर्शन होते. हा राम-दत्त-भेटीचा प्रसंग श्रीधराने दत्तमहात्म्याने रंगवून टाकला आहे.[४०]

मग अत्रीचिया आश्रमाप्रति। येता झाला जनकजापति।
तों देखिली दत्तात्रेयमूर्ति। अविनाशास्थिति जयाची।।१७।।
सह्याद्रीवरी श्रीराम। अज अजित मेघश्याम।
श्रीदत्रात्रेय पूर्णब्रह्म। देत क्षेम तयातें।।१८।।
क्षीरसागरींच्या लहरिया। कीं जान्हवी आणि मित्रतनया।
परस्परें समरसोनिया। एक ठायीं मिळताती।।१९।।
कीं नाना वर्ण गाई। परि दुग्धास दुजा वर्ण नाहीं।
तैसा जनकाचा जावई। आणि अत्रितनय मिसळलें।।२०।।
अवतार ही उदंड होती। सर्वेचि मागुती विलया जाती।
तैसी नव्हे दत्तात्रेयमूर्ति। नाश कल्पांतीं असेना।।२१।।
पूर्ण ब्रह्म मुसावलें। तें हें दत्तात्रेयरुप ओतिलें।
ज्याचे विलोकनमात्ते तरले। जीव अपार त्रिभुवनीं।।२२।।
सकळ सिद्ध दुषी निर्जर। विधि वाचस्पति शचीवर।
दत्तात्रेयदर्शना साचार। त्रिकाळ येती निजभावें।।२३।।
अद्यापि सह्याद्रिपर्वती। देवांचे भार उतरती।
सर्व ब्रह्मांडींची दैवतें धावतीं। अवधूतमूर्ति पहावया।।२४।।
घेता दत्तालेयदर्शन। देवांसी सामर्थ्य चढे पूर्ण।
मग ते इतरांसी होती प्रसन्न। वरदान द्यावयातें।।२५।।
ज्यासी प्रयागीं प्रात: स्नान। पांचाळेश्वरी अनुष्ठान।
करवीरपुरांत येऊन। भिक्षाटण माध्यान्हीं।।२६।।
अस्तां जातां वासरमणि। सह्याद्रीस जाती परतोनी।
तों देवांचे भार कर जोडोनी। वाट पहाती अगोदर।।२७।।
दृष्टीं देखतां दिगंबर। एकाचि होय जयजयकार।
असंख्य वाद्यांचे गजर। अद्यापि भक्त ऐकती।।२८।।
दत्तात्रेय भक्त देखता दृष्टीं। सकळ दैवतें जीं जीं सृष्टीं।
त्याचे पायीं घालिती मिठी। पुढें टाकती कर जोडूनि।।२९।।
करितां दत्तात्रेयस्मरण। भूत प्रेते पळती उठोन।
मग उपासकांशी विघ्न। कवण करूं शकेल।।३०।।
असो ऐसा स्वामी अवधूत। जो अत्रींचा महापुण्यपर्वत।
तयास वंदोनि रघुनाथ। आत्रिदर्शन घेतले।।३१।।
तंव ते अनुसूया सती। सीताराम तियेसी वंदिती।
सीतेसी अंलिंगूनि प्रीती। वर देती जहाली।।३२।।
आपुले निडळीचे कुंकुम काढिलें। तें सीतेचे कपाळीं लाविलें।
अमल वस्त्र नेसविलें। जे न मळे न विटे कल्पांती।।३३।।
गळां घातला सुमनोहार। जो कधीं न सुके साचार।
जैसा नित्य नूतन दिनकर। तेज अणुमात्र ढळेना।।३४।।
सीतेचे सुवासिक शरीर। अनुसूया करी निरंतर।
ज्यासुवासं अंबर। परिपूर्ण होय पैं।।३५।।
भेटतां राक्षस दुर्धर। सीतेसी भय न वाटे अणुमात्र।
ऐसा दिधला निर्भयवर। अनुसूयेनें तेधवां।।३६।।

(रामविजय अ १३, १६-३६)

या ओव्यांमध्ये श्रीधरांनीं दत्तात्रेयाचे अमोघ दर्शन, त्याचा निवास आणि विहार, त्याच्या अवताराचे चिरंजावित्त्व, भक्तांच्या

मनात दत्तात्रेयांविषयी असलेला पूज्य भाव व आदर, दत्तात्रेयांच्या भक्तांचे सामर्थ्य इ. गोष्टी स्पष्टपणे वर्णिलेल्या आहेत. सीतेने अनुसूयेस नमस्कार केल्यावर अनुसूयेने प्रेमाने तिला जवळ घेतले आणि आपल्या कपाळावरचे कुंकू तिला लावले, कधीही न मळणारे वस्त्र तिला नेसायला दिले, कधीही न सुकणारा फुलांचा तेजस्वी हार तिच्या गळ्यांत घातला आणि राक्षसांपासून सीतेला भय वाटणार नाही असा आशीर्वाद दिला आणि सीतेचे शरीर सुवासिक केले.

श्रीधरांनी आपल्या आदिगुरु दत्तात्रेयाच्या माहात्म्यवर्णनासाठी 'दत्तात्रेयमाहात्म्य' नावाचे २६ ओव्यांचे स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. यातील कथानक नेहमीप्रमाणेच असून कवी म्हणतो.

देवत्रयाचा गर्व हराया। अवतरलि अनुसूया आदिमाया।।
आदिपुरुष आली तो प्रकटोनिया। सिंध्य पर्वतीं करी तपश्चर्या।।१।।
आदिपुरुष दत्तात्रय स्वामी पाहिं। ब्रह्मानंद तो अभंग भेद नाही।।
श्रीधरवरद अविनाश कालत्रयीं। वर्णिली ज्या अष्टादशच्यारि साही।।२६।।

♦

---







**चित्रकार: श्री मोहन मराठे, खार मुंबई**

---

## मानसन्मान

### सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत सुरुचि मराठे प्रथम सोनल मराठे द्वितीय

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या औचित्याने श्रीमंत पार्वतीदेवी वाचनालय तुळस यांच्यावतीने श्रीशिवाजी हायस्कूल, तुळस येथे शालेय मुलांच्या हस्ताक्षर सुधारणेसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेने सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेतली होती. त्यात सुरुचि मराठे प्रथम आणि सोनल मराठे द्वितीय यांनी यश संपादन केले. त्यांना तुळस वाचनालयाच्या वतीने मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. सुरुचि मराठे आणि चि. सोनल मराठे ह्यांचे हार्दिक अभिनंदन!**

**यत्र धर्मसुतो राजा गदापार्णिर्वृकोदरः। कृष्णोऽस्त्री गाण्डिनं चापं सुहृत्कृष्णस्ततो विपत्।। – श्रीमद्भागवत १.९.१५**

**अर्थ** : जेथे युधिष्ठिरासारखा धार्मिक राजा, गदाधारी भीम, सर्व शस्त्रास्त्रे जाणणारा अर्जुन हातात गांडीव धनुष्य घेऊन सज्ज व श्रीकृष्णासारखा मित्र असा योग आहे तेथेही आपत्ती असावी काय? (अर्थात् दैवगती श्रेष्ठ हेच खरे म्हणावे)

**सर्व कालकृतं मन्ये भवतां च यदप्रियतम्। सपालो यद्वशे लोको वायोरिव घनावलिः ।। – श्रीमद्भागवत १.९.१४**

**अर्थ** : (नारदमुनी म्हणतात, पांडवहो) आपणाला आतापर्यंत जे दुःख भोगावे लागले ते खरोखर काळाच्या सपाट्यात सापडल्यामुळेच सोसावे लागले असे मला वाटते. ज्याप्रमाणे मेघ हे वायूच्या ताब्यात असतात, त्याप्रमाणे लोकपालांसह सर्वजण काळाच्या ताब्यात आहे.

♦

# गुंतवणुकीसाठी उपलब्ध पर्याय

• श्रीनिवास मराठे (पृ.३९२) भ्रमणध्वनी : ९८३३२१६४६८

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध सुरू होऊन आता एक वर्ष झालं सुद्धा! भारतच नव्हे तर संपूर्ण जगावर या युद्धाचे परिणाम आता प्रकर्षाने जाणवू लागले आहेत. अर्थात युद्धात सहभाग असलेले दोन्ही देश विविध वस्तूंच्या व्यापारात आघाडीवर असल्याने त्यांच्याशी व्यापारी दृष्ट्या संबंधित सर्व देश विशेषतः युरोप या युद्धात सर्वाधिक बाधित झाला आहे. याला कारण म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षतेखाली नाटो देशांनी युक्रेनला दिलेला पाठींबा आणि परिणामतः रशियावर लादलेले व्यावसायिक निर्बंध! यामुळे पेट्रोल आणि नैसर्गिक वायू यासाठी रशियावर आणि अन्नधान्यासाठी युक्रेनवर अवलंबून असलेले अनेक युरोपीय देश कोंडीत सापडले आहेत आणि त्यांच्या देशांत या वस्तूंचा तुडवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक छोट्या देशांची अर्थव्यवस्था कोलमडली आहे आणि जनता बेसुमार महागाई आणि अत्यावश्यक गरजा पूर्ण होत नसल्याने घायकुतीला आली आहे. त्यातच परकीय गंगाजळीची वानवा असलेले अनेक देश (कारणे वेगळी असली तरी) उदा. श्रीलंका आणि पाकिस्तान आता दिवाळखोरीच्या उंबरठयावर उभे आहेत. भारताने वरकरणी अलिप्ततेचे धोरण स्वीकारले असले तरी १९७१ मधील उपकाराची फेड म्हणूनच की काय, रशियाशी करार केला आणि २५% ते ३०% कमी दराने भारत क्रुड तेल आयात करू लागला. मात्र तेलासाठी दाही दिशा फिरणाऱ्या युरोपातील देशांच्या मागणीमुळे तेलाच्या किमतीत अनैसर्गिक वाढ होऊन त्याचे गंभीर परिणाम दिसून आता मंदीची लाट येऊ घातली आहे, नव्हे युरोपीय देशांत ती जाणवतच आहे. ग्लोबलायझेशनमुळे सर्व देश एकमेकांशी जोडले गेल्याने याचे परिणाम क्रमशः सर्वच देशांवर होऊ लागल्याने या सर्वांचा परिणाम जागतिक शेअरबाजारांवर न झाला तरच नवल! सुदैवाने परकीय गंगाजळीची स्थिती कधी नव्हे एव्हढी मजबूत असल्याने आणि अलोट लोकसंख्येमुळे देशांतर्गत मागणीत परिणामकारक घट न झाल्याने भारत या सर्व धक्क्यांपासून अलिप्त राहिला आणि राहात आहे असेच म्हणावे लागेल.

मात्र परकीय गुंतवणूकदार सर्वच देशांतून पळ काढीत असल्याने भारतदेखील त्यास अपवाद नाही. म्हणून त्या संकटाला तोंड देणे अवघड झाले आहे. आणि परिणामतः शेअरबाजारात अनैसर्गिक चढावउतार पहायला मिळत आहेत. महागाई वाढत असल्याने व्याजदर वाढविणे किंवा अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग मंदावू देणे या दोन पर्यायांतून मध्यम मार्ग निवडण्यासाठी RBI ने टप्प्याटप्प्यात दरवाढ करण्याचा पर्याय निवडला. परिणामतः एप्रिल २०२२ (मे २०२२) ते फेब्रुवारी २०२३ या कालखंडातील RBIच्या आर्थिक धोरण विषयक समितीच्या सर्व द्वैमासिक आढाव्यांत रिपो रेट्स मध्ये दरवेळी ०.३५% ते ०.५०% एवढी वाढ करून तो आता ४.००% वरून ४.४०%, ४.९०%, ५.४०%, ५.९०% ते फेब्रुवारी २३ च्या बैठकीत ६.२५% पर्यंत वाढवला आहे. या कारणाने कर्ज घेणे महाग झाले आहे परंतु नियमित बचत करणाऱ्या वर्गाला आणि विशेषतः केवळ व्याजाच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना आपल्या ठेवींवर अधिक व्याज मिळू लागले आहे. मात्र कर्जदरांतील वाढ, रिपो रेट्स मधील वाढीच्या तुलनेत जास्त तर ठेवींच्या दरातील वाढ तुलनेत कमी आहे. अर्थात, बँकांनी आपला नक्त नफा मात्र वाढवून घेतलेला आहे. महागाई दर आटोक्यात येण्यासाठी RBIच्या अनुमानापेक्षा जास्त वेळ लागत असल्याने अशी वाढ अजून कमाल २ द्वैमासिक आढाव्यात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात नक्त व्याजदर, म्हणजे व्याजदर वजा महागाई दर, जो RBI ने दिलेल्या वचनाप्रमाणे, १%च्या आसपास आणावयाचा असल्यास, कदाचित अधिक वेळही लागू शकेल.

शेअर बाजारातील NIFTY ५० हा निर्देशांक कमाल १८६०० वरून आजमितीला १७३००च्या आसपास म्हणजे जवळपास ७% घसरला आहे. तो कदाचित १६८०० पेक्षा खाली जाणारही नाही. पण त्यासाठी युक्रेन युद्धावर तोडगा निघणे आवश्यक आहे. शेअर बाजारात असलेल्या या अशा अनिश्चिततेच्या वातावरणात या क्षणीतरी नवी गुंतवणूक करणे संयुक्तिक ठरणार नाही, विशेषतः आधीची गुंतवणूक तोट्यात असल्यास! ज्यांनी SIP केली असेल त्यांना ती थांबवणे शक्य असले तरी हा त्या त्या व्यक्तीचा वैयक्तिक निर्णय असेल. One should not keep all, eggs in one basket या प्रसिद्ध उक्तीला अनुसरून काही गुंतवणूक ठराविक व्याजाच्या ठेवींत,

काही रक्कम ठराविक व्याजदराचे मुदत रोखे या स्वरूपांत, काही सोने व तत्सम मौल्यवान धातूंच्या स्वरुपात (शक्यतो गोल्ड बॉन्ड्स मध्ये) तर उर्वरित शेअर बाजारात ठेवणे कधीही श्रेयस्कर. या दृष्टीने उपलब्ध विविध पर्यायांचा उहापोह या लेखात करणे उचित ठरेल. यांत मुख्यत्वे Small Saving Schemes अंतर्गत येणाऱ्या योजना आहेत. (पहा: https://www.indiapost.gov.in/Financial/Pages/Content/Post-Office-Saving-Schemes.aspx) RIPO Rates कमी होण्याच्या म्हणजे एप्रिल २०२० ते एप्रिल २०२२ या काळातही या सर्व योजनांतील व्याजदर सरकारने कायम ठेवले होते हे विशेष! या कारणाने या योजनेतील गुंतवणूक बँकांतील गुंतवणुकीपेक्षा फायदेशीर ठरल्याने त्यात एप्रिल २०२० ते फेब्रुवारी २०२२ पर्यंत म्हणजे २३ महिन्यांत १०,७८,५३५ कोटी ते १४२६७३७ कोटी म्हणजे ३२.३०% वाढ झाली. फेब्रुवारी २०२२ नंतरचा Data RBI च्या संकेतस्थळावर उपलब्ध नाही. (पहा: https://dbie.rbi.org.in/DBIE/dbie.rbi?site=publications#!16 )

**१. PPF (भविष्य निर्वाह निधी): (मार्च २०२३ ला संपणाऱ्या तिमाहीसाठी व्याजदर ७.१०%)**

*PPF खात्याचे फायदे:*

❖ **करमुक्त उत्पन्न:** PPF खात्यावर तिहेरी फायदा आहे. प्रतिवर्षी भरली जाणारी रक्कम रु. १,५०,०००/- पर्यंत आयकर कायदा कलम 80C अंतर्गत करमुक्त आहेच. शिवाय प्रतिवर्षी मिळणारे व्याज पूर्णपणे करमुक्त आहे. खेरीज मुदतपूर्तीनंतर मिळणारी संपूर्ण रक्कम देखील करमुक्त आहे. (EEE बेनिफिट). अवयस्क पाल्याच्या नावाने (माता/पित्याच्या पालकत्वाखाली) खाते उघडता येते. पालकाला उपलब्ध सर्व करसवलती पाल्याला देखील उपलब्ध.

❖ **जोखीममुक्त:** भारतीय संघराज्याची हमी असल्याने ही गुंतवणूक सार्वभौमत्वाच्या जोखमीपासून मुक्त आहे.

❖ **कायदेशीर संरक्षण:** हे खाते कोणत्याही न्यायालयीन आदेशानुसारही संलग्न करता येत नाही.

❖ **दीर्घ मुदतीची गुंतवणूक:** बहुशः बँकेपेक्षा फायदेशीर ठरलेली ही १५ वर्षे अशा दीर्घ मुदतीची गुंतवणूक आहे.

❖ **तरता व्याजदर:** पूर्वी यांवरील व्याजदर दरवर्षी बदलत असत. मात्र हल्ली दर तिमाहीला बदलत्या व्याजदरांमुळे चढत्या व्याजदरांच्या काळात ही गुंतवणूक अधिक फायदेशीर ठरू शकते. एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२२ या काळात सर्व अल्पबचत योजनांवरील व्याजदर स्थिर होते.

*PPF खात्याचे तोटे आणि मर्यादा:*

❖ कमाल गुंतवणूक प्रतिवर्षी केवळ रु. १.५ लाख पर्यंतच मर्यादित आहे.

❖ आर्थिक नियोजन न करणाऱ्या/आर्थिक शिस्त न पाळणाऱ्या व्यक्तींसाठी ही गुंतवणूक त्रासदायक ठरते;

❖ खातेदार एकापेक्षा जास्त खाती उघडू शकत नाही;

❖ अनिवासी भारतीय व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंबे आणि न्यास/सोसायट्या यांच्यासाठी ही योजना खुली नाही;

❖ महिन्याच्या ५ तारखेच्या आत पैसे न भरल्यास संपूर्ण महिन्याचे व्याज मिळत नाही.

❖ संयुक्त खाते उघडू शकत नाही. केवळ व्यक्तिगत खाते उघडता येते.

नियमावलीसाठी पहा: https://www.indiapost.gov.in/VAS/DOP_PDFFiles/Savings%20Bank/Public%20Provident%20Fund%20Scheme%202019%20English.pdf

**२. 'Floating Rate Saving Bonds (FRSBs)'**

हे बॉन्ड्स 'कोविड' मुळे लॉकडाऊन होण्याच्या महिनाभर आधी म्हणजे फेब्रुवारी २०२० मध्ये RBI ने जारी करण्यास सुरुवात केली. ७ वर्षे मुदतीच्या ह्या बाँडसवर राष्ट्रीय बचतपत्रांवर मिळणाऱ्या दरापेक्षा ०.३५% अधिक म्हणजे सध्या ७.३५% दराने व्याज मिळते. हे व्याजदर दर तिमाहीला बदलत असल्याने ही तरत्या व्याजदराची गुंतवणूक आहे. सध्या व्याजदर चढे असल्याने (अजून अंदाजे १% वाढ अपेक्षित) NSC वरील प्रत्येक दरवाढीचा फायदा मिळून तो पर्यन्त तरी ही योजना बँकेतील ठेवीपेक्षा फायदेशीर ठरेल. व्याज दर सहामाहीला म्हणजे १ जानेवारी आणि १ जून रोजी मिळते. मात्र खासगी कंपन्यांच्या तुलनेत हा दर कमी आहे. Cumulative ठेवीसाठी कमाल दर - वार्षिक चक्रवाढीने असे आहेत: बजाज फायनान्स ७.९५%, महिंद्रा फायनान्स ७.७५%, HDFC ७.५०% आणि PNB हाऊसिंग फायनान्स ७.६०% (ज्येष्ठ नागरिकांसाठी ०.२५% जास्त आणि सहामाही/तिमाही व्याजसाठी सुमारे ०.१५% ते ०.३०% कमी). व्याजाचे उत्पन्न वार्षिक उत्पन्नात समाविष्ट होत असल्याने त्यानुसार कर देय असेल. हे बॉन्ड्स या योजनेत समाविष्ट बँकेत Electronic Form मध्ये जमा होतात. खाते उघडण्याची प्रक्रिया बँकेत मुदत ठेव ठेवण्याच्या प्रक्रियेप्रमाणे असते.

**३. 'Sovereign Gold bonds (SGBs)'**

ही योजना नोव्हेंबर २०१५ पासून सुरू करण्यात आली होती. ९९.९% शुद्धतेच्या सोन्याच्या भावावर आधारित या बाँडची किंमत २०१५ मध्ये १ ग्रामसाठी २५३० व व्याजदर २.७५% तर डिसेंबर २०२२ मध्ये ५४०९/- व व्याजदर २.५०% होते.

या योजनेचा यापुढील Issue मार्च २०२३ च्या मध्यावर होणार आहे. सोनाराकडून सोने बिस्किट किंवा नाणी या स्वरूपात विकत घेण्यापेक्षा Gold Bonds हा पर्याय नक्कीच फायद्याचा! कारण असे केल्याने वजनात/ किमतीत घट या गोष्टीशी सुतराम संबंध येत नाही. (पहा: https://rbidocs.rbi.org.in/rdocs/content/pdfs/DGOI29082016.pdf)

**SGB म्हणजे काय?:** १ ग्राम सोन्याच्या मूल्याधारित ठराविक मुदतीचे आणि व्याजदराचे सरकारी कर्जरोखे.

**पात्रता:** निवासी भारतीय व्यक्ती अथवा HUF, कोणतेही सार्वजनिक न्यास, महाविद्यालये, सामाजिक आणि धर्मादाय कार्याशी संबंधित संस्था (क्लब आणि सोसायट्या नव्हे). व्यक्तींचे संयुक्त खाते उघडणे शक्य. KYC बंधनकारक.

**जोखीम:** भारतीय संघराज्याची हमी असल्याने ही गुंतवणूक सार्वभौमत्वाच्या जोखमीपासून मुक्त असली तरी निर्गुंतवणुकीचा दर सोन्याच्या चालू भावाशी निगडीत असल्याने भांडवली जोखीम नक्कीच आहे. मात्र दर गुरूपुष्य योगाच्या वेळी किंवा ठराविक काळानंतर सोनारकडून सोन्याची खरेदी करणारे मात्र अशी जोखीम अजिबात अस्तित्वात नसल्याचा निर्वाळा नक्कीच देतील.

**जारी करणारी संस्था:** RBI काही विशिष्ट बँकांमार्फत.

**धारण करण्याची पद्धती आणि हस्तांतरण:** बाँडस DMAT स्वरूपात तसेच कागदपत्र स्वरूपात. गिफ्ट म्हणून अथवा इतर पद्धतीने हस्तांतरण शक्य.

**जारी करण्याची किंमत:** जारी करण्याच्या दिवसाच्या आधीचे ३ कामकाजी दिवस Indian bullion and Jewelers association द्वारा प्रसिद्ध केलेली ९९.९% शुद्धतेच्या सोन्याची सरासरी किंमत. रक्कम Online भरणाऱ्यांना किंमतीत रु. ५०/- (प्रतीग्राम) सवलत.

**कमाल आणि किमान गुंतवणूक:** एका आर्थिक वर्षात, किमान १ ग्राम किंवा त्या पटीत आणि व्यक्तीसाठी कमाल ४ किलो तर न्यासासाठी कमाल २० किलो.

**मुदत:** ८ वर्षे. मात्र ५ वर्षे पूर्ण झाल्यावर मुदतपूर्व निर्गुणवणूक शक्य.

**व्याजदर:** २०१५ मध्ये २.७५% होता तर हल्ली २.५०% प्रतिवर्षी. व्याज दर सहामाहीस मिळते. त्यावर TDS कापला जात नाही.

**निर्गुंतवणूकीची किंमत:** प्रक्रिया जारी करण्याच्या किंमतीच्या प्रक्रियेप्रमाणेच.

**करपात्रता:** मिळणारे व्याज वार्षिक उतपन्नात गणले जाऊन त्यानुसार कर देय. मात्र होणारा भांडवली नफा पूर्णतः करमुक्त. दीर्घकालीन नफ्यासाठी Indexation ची सुविधा उपलब्ध. या कारणाने व्यक्तिगत गुंतवणूकदारांसाठी योजना फायद्याची.

**कर्ज पात्रता:** हे रोखे कोणत्याही कर्जासाठी तारण म्हणून स्वीकारले जातात.

**खरेदी विक्री व्यवहार:** या रोख्यांची खरेदी विक्री कोणत्याही Stock Exchange वर होऊ शकते. मात्र खरेदीदार अशा व्यवहारांसाठी पात्र असल्यासच.

(पहा:https://www.rbi.org.in/Scripts/FAQView.aspx?Id=109#:~:text=SGBs%20are%20government%20securities%20denominated,behalf%20of%20Government%20of%20India (https://www.livemint.com/money/personal-finance/sovereign-gold-bonds-investors-can-redeem-january-2016-sgbs-at-85-premium-over-issue-price-11644304884328.html

या रोख्यांच्या किंमती अशा होत्या: २५३० (नोव्हें. २०१५), ३००७ (ऑक्टो. २०१६), २८६६ (डिसें २०१७), ३११९ (डिसें २०१८), ३७९५ (डिसें २०१९), ५००० (डिसें २०२०), ४७९१ (नोव्हें. २०२१), ५४०९ (डिसें २०२२). त्यामुळे जानेवारी २०२३ मध्ये निर्गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीचा भांडवली नफा, कालखंड आणि Compound Annual Growth Rate (CAGR) अनुक्रमे असे होते: ११३% (७ - CAGR १५%), ८०% (६ - CAGR १०.२५%), ८८.७५% (५ - CAGR १३.५५%), ७३.४०% (४ - CAGR १४.८०%), ४२.५०% (३ - CAGR १२.५४%), ८.२% (२ - CAGR ४.००%) आणि १२.९०% (१ - CAGR १२.९०%), (पहा. https://www.financialcalculatorindia.app/sovereign-gold-bond-price-history.html

**४. सुकन्या समृध्दी योजना (तरुण पिढीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी योजना):**

**पात्रता:** १० वर्षाखालील कन्येचे पालक. मात्र प्रत्येक कन्येसाठी कुठल्याही पोस्ट ऑफिस मध्ये किंवा विशिष्ठ बँकेत केवळ एकच खाते. कमाल २ कन्यांच्या नावे खाते उघडणे शक्य. मात्र जुळी किंवा तिळी झाल्यास २ पेक्षा अधिक खाती उघडणे शक्य.

**किमान आणि कमाल रक्कम:** एका आर्थिक वर्षात किमान रु. २५०/- व कमाल रु. १,५०,०००/-

**व्याजदर:** दर तिमाहीला बदलू शकणारा तरता व्याजदर ७.६०% प्रतिवर्ष.

**मुदत:** कन्येचे वय २१ होईपर्यंत. म्हणजेच किमान ११ मात्र कमाल १५ वर्षे

**खात्यातील व्यवहार:** कन्या १८ वर्षांची होईपर्यंत पालक त्यानंतर कन्या स्वतः व्यवहार करू शकते.

**निर्गुंतवणूक:** कन्या १० वी उत्तीर्ण झाल्यावर किंवा १८ वर्षांची झाल्यावर ती किंवा पालक, खात्यात मागील आर्थिक वर्षा अखेरीस असलेल्या रकमेच्या ५०% रक्कम जरुरीनुसार (शिक्षणाचा खर्च किंवा इतर तत्सम कारणांसाठी) काढू शकतील.

**करसवलती:** खात्यात भरली जाणारी रक्कम आयकर कलम 80C अंतर्गत करसवलतीस पात्र. तसेच मिळणारे वार्षिक व्याज संपूर्णपणे करमुक्त.

**खाते बंद करणे:** कन्या २१ वर्षांची झाल्यावर अथवा तिचा विवाह झाल्यास (विवाहाच्या १ महिना आधी किंवा ३ महिने नंतर पर्यंतच्या मुदतीत) नियमांसाठी पहा:
https://www.indiapost.gov.in/VAS/DOP_PDFFiles/Savings%20Bank/Sukanya%20Samriddhi%20Account%20Scheme%202019%20English.pdf

**५. LICची प्रधानमंत्री वयवंदना निवृत्तीवेतन योजना (सुधारित):**

ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली 'प्रधानमंत्री वयवंदना योजना' ४ मे २०१७ मध्ये सुरू झाली होती ज्यात ८% व्याजदर आश्वासित केले गेला होता आणि प्रतिव्यक्ती कमाल एकरकमी गुंतवणूक रु. ७.५० लाख होती. ह्या योजनेचा कालावधी आर्थिक वर्ष २०१७-१८ ते २०१९-२० असा होता. २६ मे २०२० रोजी तो पुढील ३ आर्थिक वर्षांसाठी म्हणजे २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ साठी वाढवला गेला. आर्थिक वर्ष २०२१-२२ आणि २०२२-२३ मध्ये घेतलेल्या पॉलिसींसाठी हा व्याजदर ७.४०% सुनिश्चित केला गेला आहे आणि प्रतिव्यक्ती कमाल एकरकमी गुंतवणूक रु. १५ लाख. कदाचित २०२३-२४ या आर्थिक वर्षांपासून ती बंद होऊ शकते. परंतु हे सार्वत्रिक निवडणुकांपूर्वीचे वर्ष असल्याने शक्यता कमी वाटते.

**पात्रता:** अर्जदाराचे वय किमान ६० वर्षे. कमाल वयमर्यादा नाही.

**मुदत:** १० वर्षे

**निवृत्तीवेतनासाठी पर्याय:** खरेदीदारास निवृत्तीवेतनासाठी मासिक, तिमाही, सहामाही आणि वार्षिक असे पर्याय उपलब्ध आहेत.

**गुंतवणुकीचा प्रकार:** या पॉलिसीचे खरेदीमूल्य प्रतिव्यक्ती किमान १०००० आणि कमाल रु. १५ लाख आहे. अर्थात पतीपत्नी मिळून सुमारे ३० लाख गुंतवणूक करू शकतील.

**योजनेचे फायदे:** संपूर्ण गुंतवणूक सेवाकर आणि GST मुक्त आहे.

रु.१०००/- खरेदीमूल्य असल्यास विविध पर्यायांसाठी निवृत्तीवेतनाचे दर आणि कमाल खरेदीमूल्य असे आहे.

| **पर्याय** | **निवृत्तीवेतन** | **खरेदीमूल्य** |
|---|---|---|
| मासिक | प्रतिवर्षी रु. ७४.०० | रु. १५,००,०००/- |
| तिमाही | प्रतिवर्षी रु. ७४.५० | रु. १४,८९,९३३/- |
| सहामाही | प्रतिवर्षी रु. ७५.२० | रु. १४,७६,०६४/- |
| वार्षिक | प्रतिवर्षी रु. ७६.६० | रु. १४,४९,०८६/- |

**मृत्यूनंतर मिळणारी रक्कम:** जर योजनेच्या १० वर्षाच्या काळात गुंतवणूकधारकाचा मृत्यू झाला तर सर्व खरेदीमूल्याचा परतावा मिळेल.

**योजनासमाप्तीपूर्व मिळणारी रक्कम:** जर प्रकृती वा अन्य कारणाने जरूर भासल्यास खरेदीमूल्याच्या ९८% रक्कम मिळू शकते.

**मुदतपूर्तीनंतर मिळणारी रक्कम:** संपूर्ण खरेदीमूल्य.

तरुण किंवा ज्येष्ठ नागरिक नसलेल्या व्यक्तींसाठी जीवन अक्षय VII ही योजना आहे. मात्र त्यावर मिळू शकणारा व्याजदर (CAGR) मात्र कमी म्हणजे ५.८% आहे. त्यानंतर निवृत्तीवेतन या प्रकारात मोडणाऱ्या LICच्याच २ ते ३ तर इतर विमा कंपन्याच्या अनेक योजना आल्या आहेत मात्र त्या सर्व योजनांतून मिळू शकणाऱ्या व्याजाच्या उत्पन्नाचा CAGR ६% ते ६.५०% इतकाच आहे.

**६. Corporate Deposits:**

बजाज फायनान्स, महिंद्र फायनान्स, श्रीराम ट्रान्सपोर्ट कंपनी, HDFC लि. PNB हौसिंग फायनान्स आदि आर्थिक उलाढाली करणाऱ्या कंपन्या मुदत ठेवी स्वीकारतात. अशा ठेवी १२ महिने ते ४५ ते ६० महिने मुदतीच्या आहेत. पूर्वी जेव्हा व्याजदर सतत चढे असत तेव्हा गुंतवणूकदारांचा कल ठेवी १२ महिने ते २४ महिने मुदतीच्या ठेवण्याकडे असे. मात्र येत्या ४/५ महिन्यात व्याजदर कमाल उंची गाठतील अशी अटकळ आहे. त्यामुळे त्यानंतर ठेवी कमाल मुदतीसाठी ठेवणे श्रेयस्कर. या कंपन्यांचे व्याजदर बहुतेक सर्व बँकांच्या व्याजदरांपेक्षा जास्त आहेत तसेच अल्पबचत संचलनालयाच्या बहुतेक योजनांच्या व्याजदरांपेक्षा जास्त आहेत. अशा मुदत ठेवीच्या बाबतीत गुंतवणूक या विषयात आर्थिक शिस्त नसलेल्या व्यक्तींनी पाळावयाची व्यवधाने अशी:

A) उतरत्या व्याजदरांच्या काळात ठेवींची मुदत आवश्यकतेच्या

मर्यादेत जितकी जास्त ठेवता येईल तेव्हढी ठेवल्यास तर उलटपक्षी चढ्या व्याजदरांच्या काळात जितकी कमी ठेवता येईल तेव्हढी कमी ठेवून (मात्र एक वर्षापेक्षा जास्त) प्रत्येक मुदतपूर्तीनंतर त्यावेळी असलेल्या व्याजदराने किंवा Auto Renewal हा पर्याय निवडून व्याजाचे उत्पन्न वाढवता येऊ शकेल.

B) उतरत्या व्याजदराच्या काळात, किंवा ठराविक उत्पन्न ठराविक कालांतराने मिळत राहण्याची आवश्यकता नसलेल्या व्यक्तींनी दरमहा किंवा दर तिमाही/सहामाही किंवा वार्षिक व्याजाचा पर्याय न निवडता Cumulative म्हणजे व्याजाची सर्व रक्कम मुदतपूर्तीनंतर मिळण्याचा पर्याय स्वीकारावा ज्यायोगे मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेची देखील अधिक दराने पुनर्गुंतवणूक होत राहील. उलटपक्षी चढ्या व्याजदराच्या काळात दरमहा किंवा दर तिमाही/सहामाही किंवा वार्षिक व्याजाचा पर्याय निवडल्यास आणि त्या व्याजाच्या उत्पन्नाची आवश्यकता नसल्यास, जमा होणाऱ्या व्याजाच्या रकमेची चढ्या व्याजदराने गुंतवणूक करून उत्पन्न वाढवता येईल.

**७. ज्येष्ठ नागरिक बचत योजना (SCSS):**

खास ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या या योजनेत आपली स्वकष्टार्जित मिळकत ते गुंतवू शकतात. अल्पबचत संचालनालयाच्या विविध योजनांपैकी ही सर्वात जास्त व्याजदराची योजना आहे.

**योजनेची वैशिष्ट्ये:**

**वर्गीकरण:** २००४ साली कार्यान्वित झालेल्या या योजनेत ठराविक व्याजदराने ५ वर्षे मुदतीची ठेव स्वीकारली जाते.

**पात्रता:** ६०+ चे ज्येष्ठ नागरिक तसेच स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या ५५+ च्या व्यक्ती आणि सैन्यदलातील ५०+ परंतु ६० वर्षांखालील व्यक्ती निवृत्तीनंतरचे लाभ मिळाल्यापासून १ महिन्याच्या आत अशी खाती उघडू शकतात. जोड खाते उघडणे शक्य मात्र केवळ सांसारिक जोडीदारासहच! मात्र जोडखात्यातील सर्व रकमेचे स्वामित्व प्रथम खातेदाराचे गणले जाते.

**प्राप्त करण्याची पद्धत:** कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये किंवा ठराविक बँकांच्या शाखांत विहित नमुन्यातील स्वाक्षरीत अर्ज करून योग्य ती KYC कागदपत्रे सादर करून खाते उघडू शकतात. आपल्या बँकेचा / पोस्ट ऑफिसच्या बचत खात्याचा धनादेश किंवा पोस्ट ऑफिस पेमेंट बँकेतील खात्यातून रक्कम हस्तांतरित करून किंवा रोखीने (केवळ रु. ५००००/-पर्यंत) रक्कम जमा करता येते.

**गुंतवणुकीची रक्कम:** किमान रु. १०००/- आणि नंतर रु. १०००/-च्या पटीत. विविध ठिकाणच्या सर्व खात्यातील एकत्रित रक्कम कमाल रु.१५ लाख. ही रक्कम एप्रिल २०२३ नंतर रु. ३० लाख पर्यंत वाढवण्यात येणार आहे.

**कालावधी:** ५ वर्षे. योजनेचा व्याजदर पूर्ण मुदतीसाठी लागू.

**व्याजदर:** अर्थमंत्रालयाने निश्चित केलेले व्याजदर २००४-२०१२ - ९%, २०१३-१४ - ९.३०%, आता ८.००%

**व्याज अदा करण्याची पद्धत:**

दर तिमाही म्हणजे ३० जून, ३० सप्टेंबर, ३१ डिसेंबर, आणि ३१ मार्च धारकाच्या बँकेतील निर्देशित खात्यात किंवा पोस्ट ऑफिस बचत खात्यात जमा होते. खाते नसल्यास धारकाने त्याची मागणी करणे आवश्यक. देय दिनांकास न घेतल्यास त्या व्याजावर व्याज (चक्रवाढीने) दिले जात नाही.

**नामनिर्देशन:**

नामनिर्देशन कोणाही व्यक्तीच्या नावे (अवयस्क असल्यास पालकत्वाखाली) करता येते.

**मुदतपूर्तीनंतर परतफेड:**

मुदतपूर्तीनंतर पासबुक/ पावती योग्य निर्देशांसह खाते असलेल्या पोस्ट ऑफिसात सादर करणे आवश्यक.

**कालावधी वाढवणे:**

सुरुवातीची ५ वर्षे मुदत संपल्यानंतर पुढील ३ वर्षांसाठी मुदतवाढ शक्य. मात्र तत्कालीन व्याजदराने.

अशी मुदतवाढ मुदत पूर्ण झाल्यानंतर १ वर्षापर्यंत होऊ शकते.

पहा: https://www.indiapost.gov.in/Financial/Pages/Content/Post-Office-Saving-Schemes.aspx

**मुदतपूर्व परतफेड:**

एक वर्षाच्या आत घेतल्यास व्याज दिले जात नाही.

१ ते २ वर्षात परतफेड घेतल्यास दंड मुद्दलाच्या १.५% आहे. तर २ वर्षानंतर दंड मुद्दलाच्या १% आहे.

मात्र मुदतवाढ घेतलेले खाते कधीही बंद करता येते. त्यावर दंड आकाराला जात नाही.

**करसवलत:**

यातील गुंतवणूक आयकर कायदा कलम 80C अंतर्गत सवलतीस पात्र आहे. मात्र मिळालेले व्याज 'व्याजाचे इतर उत्पन्न' या सदराखाली करपात्र असते. वार्षिक रु. ५०,०००/- च्या व्याजावर TDS कापला जात नाही.

आयकर नियमांत पात्र खातेदार 15G/15H अर्ज दाखल करून TDS कापला जाणे टाळू शकतात.

♦

पुस्तक परिचय

# हिंदू साम्राज्याचा इतिहास

•डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

वीराग्रणी डॉ. नारायण दामोदर सावरकर (म्हणजे तिसरा सावरकर) यांनी लिहिलेल्या 'हिंदू साम्राज्याचा इतिहास' हा ग्रंथ म्हणजे हिंदू संस्कृतीचा ठेवा आहे.

भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात 'सावरकर युग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुप्रसिद्ध क्रांतिकारक त्रिवर्ग सावरकर बंधूपैकी, स्वातंत्र्यवीर तात्याराव, क्रांतिवीर बाबाराव याहून सर्वात धाकटे वीराग्रणी डॉ. नारायण दामोदर सावरकर. राहुरीच्या पेशवेकालीन जहागीरदार घराण्यात त्यांचा जन्म झाला.

क्रांतिकार्य करीत असताना देशाला सर्वस्व वाहिलेल्या सावरकर घराण्याची वाताहत झाली. धनदौलत, जहागिरी जप्त झाल्या. दोघे वडील बंधू काळ्यापाण्यावर आणि डॉ. सावरकरांना सश्रम कारावास. सुटून आल्यावर घरावर पोलिसांच्या सतत धाडी आणि जप्त्या. त्यात संबंध सावरकर कुटुंबाच्या पोषणाची चिंता व समाजाकडून अक्षम्य उपेक्षा वाट्याला आलेली. अशा संघर्षमय परिस्थितीत हिंदू साम्राज्याचा इतिहास लिहून डॉ. सावरकर यांनी मराठी संशोधन वाङ्मयात निश्चित मोलाची भर घातली आहे.

हिंदू पूर्वजांचा इतिहास स्फूर्तिप्रद आहे.

आपल्या या भारताने एकेकाळी सर्व जगावर हिंदूंचे सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय अधिराज्यही गाजविले होते. हिंदू जातीने एकेकाळी सर्व जगाला आपल्या तत्त्वज्ञानाने, शास्त्रज्ञानाने, बुद्धिवैभवाने नि पराक्रमाने दिपविले होते. बहुतेक ज्ञात जग हिंदुस्थानला गुरुस्थानी मानीत. ही दंतकथा किंवा भाकडकथा नसून हा सत्य इतिहास आहे. हा हिंदू पूर्वजांचा इतिहास अद्भुत, तेजस्वी, आत्माभिमान आणि आत्मविश्वास निर्माण करणारा आहे हे या ग्रंथवाचनाने लक्षात येते. प्रत्येक देशवासीयाने, तरुणाने विद्यार्थ्याने हा इतिहास आवर्जून वाचला पाहिजे. म्हणजे त्याच्या मनातील अनेक पूर्वग्रह, संदेश नष्ट होतील.

परक्यांनी लिहिलेल्या तेजोभंगाकारी इतिहासांनी, परकीयांनी केलेल्या निंदेने केवळ दोषच आणि तेही अतिशयोक्तपणे दाखविले गेल्याने, हिंदूंची मनोवृत्ती पराभूतपणाची, नैराश्याची बनण्याची शक्यता निर्माण झाली. तेव्हा हा हिंदू साम्राज्याचा इतिहास वाचला तर हिंदुस्तानचा इतिहास हा पराभवांचा इतिहास नाही, तर शौर्यशाली पराक्रमाचा इतिहास आहे. हे लक्षात येऊन वाचकांच्या मनातल्या अपसमज दूर होईल. हिंदूंची गेल्या हजारो वर्षांतील दिग्विजयाची कथा सत्य स्वरुपात डॉ. सावरकरांनी या ग्रंथात सांगितली आहे. ती वाचून मन स्तिमित होते, चैतन्यमय, उत्साही होते.

### माहितीपूर्ण आणि इतिहासाला प्रामाणिक ग्रंथ

डॉ. सावरकरांचा हा ग्रंथ माहितीपूर्ण आहे, तेवढाच इतिहासालाही प्रामाणिक आहे. या ग्रंथाचे दोन विभाग पाडले आहेत. पहिला ख्रिस्तपूर्व ३००० वर्षांचा प्राचीन इतिहास व दुसरा मध्ययुगीन ख्रिस्ताबाद १२०० पर्यंतचा.

कोलंबसने अमेरिका शोधून काढली असे सर्वांना वाटते, पण ते खरे नाही तर प्रियव्रत सम्राटाने अमेरिका खंड जिंकला होता, कसा तो या ग्रंथातून सांगितले आहे. अगस्तीमुनी हा शास्त्रज्ञ, निष्णात क्षत्रिय म्हणून द. हिंदुस्तानात प्रसिद्ध होता. हिंदुकरणाचे महान कार्य त्यांनी केले. अगस्ती मुनी समुद्र प्यायला नाही, असुरांना (असेरियन्सना) त्यांनी अरबी समुद्रातून संपूर्णपणे हाकलून लावले. स्थापत्य शास्त्रज्ञ राजा भगिरथाने गंगेचा प्रवाह हिमालयातून दक्षिणेत वळविला. राजा मनूची ज्येष्ठ कन्या इला ही इतिहासातील पहिली पराक्रमी स्त्री, अशी नवीनच दुर्मिळ, महत्त्वपूर्ण पुष्कळ माहिती या ग्रंथवाचनाने वाचकांना होऊ शकते.

संकलकाने या ग्रंथातील वर्णनात्मक संशोधन वाचकांच्या स्मरणात येण्यासाठी त्याच वंशवेलीच्या साह्याने सारांश दिला आहे तो महत्त्वाचा व उपयोगी आहे. ग्रंथाला परिशिष्टे जोडली आहेत. त्यात भगवान येशू ख्रिस्ताविषयीचा त्याच्या काश्मीर आगमनासंबंधी यहोशुहा बेंजामिन याने लिहिलेला मजकूर आहे. त्याचप्रमाणे क्रांतिवीर बाबाराव सावरकर लिखित 'ख्रिस्ताचे हिंदुत्त्व' या पुस्तकातील येशू ख्रिस्ताने यज्ञोपवीत घालून कपाळाला गंध लावून, धोतराचा कासोटा मारुन हातात धर्माचा दंडा धरलेले प्रकाशचित्र वाचकांच्या ज्ञानासाठी जोडले आहे.

### हिंदू–हृदयसम्राट स्वातंत्र्यवीर सावरकर

अगदी अलीकडच्या काळातला क्रांतिकारक सावरकरांच्या

पूर्वजांचा इतिहास उपेक्षित राहू नये म्हणून तोही परिशिष्टात जोडला आहे.

इतिहाससंशोधक श्री. पांडुरंग बलकवडे यांनी संशोधन केलेली सनद या ग्रंथात पाहायला मिळते. सावरकरांच्या राहुरी जहागिरीचा इतिहास, प्राचीन हिंदू सम्राटांच्या पराक्रमाचे पर्व, सतत ४/५ पिढ्या केवळ राष्ट्रोद्धारासाठी वाहिलेल्या पराक्रमी सावरकरांच्या इतिहासाशिवाय पुरेच होऊ शकत नाही आणि म्हणून हिंदू-हृदयसम्राट स्वातंत्र्यवीर सावरकर आहेत. इथपर्यंतचा धागा संकलक श्री. प्रताप वेलकर यांनी उत्तमपणे या ग्रंथात जोडला आहे. डॉ. सावरकरांनी हा इतिहास लिहिताना कोणते इंग्रजी आणि संस्कृत ग्रंथ पाहिले त्याची संदर्भसूची दिली आहे.

हिंदू साम्राज्याचा इतिहास डॉ. सावरकरांनी आत्यंतिक परिश्रम घेऊन, प्रामाणिकपणे संशोधन करून, आत्यंतिक राष्ट्रभक्तीने पुनीत होऊन लिहिला आहे.

**इतिहासकार**

सुप्रसिद्ध भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य, म. म. दत्तो वामन पोतदार, रियासतकार गो. स. सरदेसाई व रावबहादूर पारसनीस या इतिहासकारांच्या पंगतीत अग्रक्रमाने डॉ. नारायणराव सावरकरांना मान द्यावा लागेल. हिंदू साम्राज्याचा इतिहास हा तेजस्वी, स्फूर्तिदायी ग्रंथ लिहून इतिहासकार म्हणून डॉ. सावरकर यांनी मराठी संशोधन वाङ्मयात निश्चितीच मोलाची भर घातली आहे. प्रत्येक हिंदूने हा ग्रंथ वाचलाच पाहिजे इतके या ग्रंथाचे महत्त्व आहे. वीराग्रणी डॉ. ना. दा. सावरकरांनी हिंदू धर्मावर, हिंदू समाजावर थोर उपकार केले आहेत आणि अशा या मौलिक ग्रंथाचे उत्तम संकलन श्री. प्रताप वेलकर यांनी केले आहे. त्यामुळे त्यांनाही धन्यवाद देणे आवश्यक ठरते. त्यांचेही वाचकांवर ऋण आहेत. नाहीतर हा ग्रंथ वाचकांपर्यंत पोचावा कसा? मा. श्री. विक्रम सावरकर, संपादक प्रज्वलंत, भूतपूर्व राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय हिंदू महासभा यांना हा ग्रंथ सादर समर्पण करण्यात आला आहे.

**हिंदू साम्राज्याचा इतिहास**
**लेखक** : वीराग्रणी
डॉ. नारायण दामोदर सावरकर
**पृष्ठसंख्या** : ४३१
**मूल्य** : ३५० रुपये
मनोरमा प्रकाशन, दादर ♦


## जय जय महाराष्ट्र माझा




जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा।। धृ.।।
भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।
काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

**- कवी: कै. राजा बढे/- गायक: कै. शाहीर साबळे**

## उपनयन संस्कार



आपले कुलबांधव आणि मराठे प्रतिष्ठानचे कार्यकारीणी सदस्य श्री. राहुल विद्वांस यांचे चिरंजीव मिहीर याची मुंज गुरुवार दिनांक २३ मार्च २०२३ रोजी थाटामाटात साजरी झाली. या उपनयन संस्काराला बटुला आशिर्वाद द्यायला मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. विजय मराठे आणि सौ. मानसी गाडगीळ पुणे कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते.

मराठे परिवाराद्वारा चिरंजीव मिहीरला अनेक उत्तम शुभाशिर्वाद!

### खसखशीचा मळा : अजब प्रश्नोतरी

**✻ पतीने आपल्या चुका का विसराव्यात?**
- *कारण पत्नी त्या लक्षात ठेवतेच ठेवते.*

**✻ कॅलेण्डर खपण्यासाठी त्याने काय युक्ती केली?**
- कॅलेण्डरला एक वर्षाची गॅरंटी दिली.

**✻ संता बुद्धिबळ स्पर्धा सोडून परत का आला?**
- कारण तो स्पोर्टस् शूज घरीच विसरला होता.

**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**